। श्रीः ।।

**अध्यक्षीय मनोगत :**

महाराष्ट्र सेवा संघाच्या वार्षिक अहवालासाठी अध्यक्षीय मनोगत लिहिणे हा एक अभिमानाचा आणि आनंदाचा विषय असतो. त्याचबरोबर ते एक आव्हानही असते. कार्याची व्याप्ती एवढी विस्तृत असते की वर्षभरातील कार्यक्रमांचा मोजक्या शब्दांत आढावा घेणे अशक्यच! संस्थेचे ८० वे वर्ष सुरू आहे. अहवाल वर्षात नेहमीप्रमाणे भव्य आणि चमकदार कार्यक्रम झालेच. उदा. गिरिमित्र संमेलन, सर्व प्रकारचे पुरस्कार वगैरे. मात्र आजवरच्या कीर्तीवर कळस म्हणजे भारताच्या नौदल सामर्थ्याचे दर्शन घडविणारे तीन दिवसांचे भव्य प्रदर्शन. ह्या अभूतपूर्व कार्यक्रमाने इतिहासच घडविला. या यशामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह वाढून यंदा वायुदलाच्या सहकार्याने असाच भव्य कार्यक्रम करण्याची योजना आहे. मुलुंड वास्तूची या ना त्या निमित्ताने दुरुस्ती व नूतनीकरण चालूच असते; पण ऐरोलीच्या म.बा.देवधर संकुलाचे यंदा प्रथमच मोठ्या प्रमाणावर नूतनीकरण झाले. ती वास्तू अधिकच सुंदर झाली आहे. पत्रकांऐवजी 'व्हॉट्सअॅप' आपल्या कार्यक्रमांची माहिती कळण्यासाठी वर्षाला केवळ १०० रुपये भरून पर्यावरणस्नेही (हरित) सदस्यत्व सुरू केले त्याला फार चांगला प्रतिसाद मिळत आहे. सर्व विभाग उत्तम कार्य करीतच आहेत. विज्ञान विभाग आणि 'सॅल्यूट इंडिया' यांमुळे तरुणांचा सहभाग वाढत आहे. त्यामुळे संस्थेचे भवितव्य उज्ज्वलच आहे. तरुणांना निर्णय घेण्याची आणि काम करण्याची मोकळीक देण्याचे आपले धोरण यशस्वी ठरत आहे. विशेष म्हणजे नेव्हीच्या कार्यक्रमात आपण मुंबई परिसरातल्या अन्य संस्थांनाही सहभागी करून घेतले.

तात्पर्य, कार्यक्रमांची गुणवत्ता, विविधता, संख्या, सातत्य, पारदर्शी व्यवहार आणि विश्वासार्हता यामुळे संस्थेच्या कीर्तीत भर टाकणारे हे वर्ष झाले आणि कीर्ती वाढविण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू आहे.

भिन्न भिन्न रुचीच्या सर्व व्यक्तींसाठी उपयुक्त कार्यक्रम देणाऱ्या या दुर्मीळ संस्थेशी जोडलेले राहाणे प्रत्येकाच्या हिताचे ठरेल आणि अशा सर्व व्यक्तींचे रसिक आणि कार्यकर्ते म्हणून सदैव स्वागतच होईल. सारे एकत्र येऊन मोठी व चांगली कामे करू या.

।। शुभं भवतु ।।

.....चंद्रशेखर वझे, अध्यक्ष.



Ahval text17.indd 1 2/2/2019 4:44:40 PM

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

## विश्वस्त मंडळ

श्री. चंद्रशेखर ना. वझे (अध्यक्ष - पदसिद्ध)

डॉ. आनंद रा. कट्टी

श्री. उल्हास कृ. हंबर्डे

श्री. किरण रा. देशमुख

श्री.अजित ग. करंदीकर

श्री. रमेश दे. धामणकर

## कार्यकारी मंडळ

पदाधिकारी

श्री.चंद्रशेखर ना. वझे -अध्यक्ष

श्री.जयप्रकाश र. बर्वे -- कार्यवाह

श्री.विनोद म. सौदागर - सहकार्यवाह

श्री. प्रकाश ह. सडेकर-सहकोषाध्यक्ष

श्री.चंद्रशेखर. म. कुलकर्णी–उपाध्यक्ष

श्री.धनंजय दि. दिवेकर- कोषाध्यक्ष

श्री.अरुण मो. भंडारे-सहकार्यवाह

## सदस्य

श्री.रवींद्र द. लाड

श्री.विनायक ज. जोगळेकर

श्री. सतीश श्री. पाटणकर

श्री. शंकर गो. वीरकर

(स्वीकृत ७.८.१६ पासून)

श्री. नितीन देशपांडे

(स्वीकृत ७ .८.१६ पासून)

श्री.प्रदीप र. सप्रे

श्री. विजय वा. वझे

श्री. अवधूत पं. गोळे

श्री. सुधीर वा. बागाईतकर

(स्वीकृत ७ .८.१६ पासून)

सहस्रचंद्रदर्शन

## ऐरोली व्यवस्थापन समिती

डॉ. आनंद रा. कट्टी - अध्यक्ष

श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह

श्री. चंद्रशेखर ना. वझे (पदसिद्ध)

श्री. प्रदीप र. सप्रे - उपाध्यक्ष

श्री. सुधीर बागाईतकर -कोषाध्यक्ष

श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध)

## मानद अंतर्गत हिशेब तपासनीस

श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी (मुलुंडसाठी), श्रीमती ज्योत्स्ना जोशी (ऐरोलीसाठी)

## हिशेब तपासनीस

मेसर्स सिंगवी, ओतूरकर, केळकर आणि कंपनी (सी. ए.)

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

**मुख्य कार्यालय व्यवस्थापन वर्ग**

श्री. संदीप परब — श्रीमती सुरेखा जोशी

**मुख्य कार्यालय सेवक वर्ग**

श्री. मोहन पवार — श्री. श्रीरंग भाष्टे
श्री. भास्कर इंगळे

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती आरती रणदिवे — श्रीमती जान्हवी राणे

**साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय सेवक वर्ग**

श्री. प्रदीप वाईकर — श्री. उमेश काणेकर

**ऐरोली शाखा कार्यालय - व्यवस्थापन वर्ग**

श्रीमती विनीता घाडीगांवकर — श्रीमती शीतल सगरे
श्रीमती शीतल झेंडे

**ऐरोली शाखा कार्यालय - सेवक वर्ग**

श्री. रमेश झोंबाड — श्री. शंकर शिंगोटे
श्री. सुरेंद्र राणे — श्री. शिवाजी पिसाळ

सहस्रचंद्रदर्शन

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**
म. से. संघ मार्ग व पं. जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.), मुंबई ४०० ०८०
दूरध्वनी : ०२२-२५६८१६३१/२५६९ ०२२५
e-mail: mss_mulund@rediffmail.com
Web Site: www.mssmulund.com

**ऐरोली शाखा**
म. बा. देवधर संकुल, म. से. संघ मार्ग, सेक्टर १७,
ऐरोली, नवी मुंबई - ४००७०८
दूरध्वनी : ०२२-२७७९१८३७/ २७७९०८३६
e-mail : mss.airoli@rediffmail.com

# महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड

म. से. संघ मार्ग व पंडित जवाहरलाल नेहरू मार्ग संयोग, मुलुंड (प.)

मुंबई - ४०० ०८०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संस्थेच्या सभासदांची वार्षिक सर्वसाधारण सभा (अहवाल वर्ष १ एप्रिल २०१६ ते ३१ मार्च २०१७) शनिवार, दि. १२ ऑगस्ट २०१७ रोजी सायंकाळी ५.३० वा. संस्थेच्या मुलुंड येथील सु. ल. गद्रे सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. अध्यक्षांच्या प्रास्ताविकानंतर खालील कामांचा सभेत विचार होईल. या सभेला सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील कामे**

१. दि. ७.८.२०१६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व इतिवृत्तांत निर्देशित केलेल्या मुद्यांबाबतच्या कार्यवाहीची माहिती घेणे आणि इतिवृत्त कायम करणे.
२. कार्यकारी मंडळाने तयार केलेल्या २०१६-१७ सालच्या अहवालास मान्यता देणे.
३. संस्थेच्या वैधानिक हिशेब तपासनिसांनी तपासलेल्या व विश्वस्त आणि कार्यकारी मंडळाने संमत केलेल्या २०१६-१७ सालच्या उत्पन्न व खर्चाचे हिशेब आणि आर्थिक ताळेबंदास मान्यता देणे.
४. २०१७-१८ सालाकरिता अंदाजपत्रक संमत करणे.
५. २०१७-१८ सालाकरिता वैधानिक हिशेब तपासनिसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
६. २०१७-१८ सालाकरिता मानद अंतर्गत हिशेब तपासनिसांची नियुक्ती करणे.
७. घटना कलम ११(ब) नुसार सभासदांकडून आलेल्या सूचनांचा विचार करणे.
८. घटना कलम १३(२) नुसार विश्वस्त मंडळातील सदस्याची १ रिक्त जागा भरणे.
९. घटना कलम १८(९)नुसार कार्यकारी मंडळातून निवृत्त होणाऱ्या ३ सदस्यांच्या जागा भरणे.
१०. ऐरोली शाखेच्या कार्याची माहिती घेणे.
११. अध्यक्षांच्या परवानगीने येणारी आयत्या वेळची कामे.

## विशेष सूचना

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब करावी लागल्यास तहकूब झालेली सभा ३० मिनिटांनंतर त्याच जागी भरेल व त्या सभेत आधीच्याच तहकूब झालेल्या सभेचे कामकाज राहील. या सभेस गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना सभांची इतिवृत्ते, हिशेबाच्या वह्या इ. पूर्वसूचनेने सोमवार, दि. ३१ जुलै २०१७ ते गुरुवार, दि.९ऑगस्ट २०१७ पर्यंत सकाळी १० ते सायंकाळी ०७.३० या वेळेत (सुटीचे दिवस सोडून) कार्यालयांत पाहण्यास मिळतील.
३. कोणत्याही सभासदास काही माहिती हवी असल्यास अथवा काही सूचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या दि.९ ऑगस्ट २०१७ पर्यंत कार्यालयीन वेळांत लेखी स्वरूपात द्याव्यात.
४. सभासदाने आपला पत्ता बदलला असल्यास संस्थेस कळवावा.
५. संस्थेच्या सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयांत सभासदांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळांत उपलब्ध होईल. ज्या सभासदाचे नाव यादीत चुकून आले नसेल त्याने ताबडतोब कार्यालयात लेखी कळवावे.
६. विश्वस्तपदावरून डॉ. आनंद रा. कट्टी निवृत्त होत आहेत. तसेच कार्यकारी मंडळातून सर्वश्री स.श्री. पाटणकर, ध. दि. दिवेकर व वि.वि. वझे निवृत्त होत आहेत व ते पुन्हा निवडणुकीस उभे राहण्यास पात्र आहेत.

**निवडणूक कार्यक्रम**

१. निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सर्वश्री चं.दि.खरे ,श्रीहरी भी. कुलकर्णी, व सु. स. सहस्त्रबुद्धे यांची निवडणूक समिती नियुक्त करण्यात आली आहे. श्री. चं.दि. खरे निवडणूक समितीचे प्रमुख असतील.

२. १ विश्वस्त व कार्यकारी मंडळातील ३ जागांसाठी निवडणूक शनिवार, दि.१२ ऑगस्ट २०१७ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या वेळेत गुप्त मतदान पद्धतीने होईल. ३१.३.२०१६ पर्यंत सभासद झालेल्या व्यक्तींनाच या निवडणुकीत मतदान करता येईल. (सभासद क्र. आजीव९२७ पर्यंत)

३. निवडणुकीची नामांकन पत्रे दि. २९ जुलै २०१७ ते ७ ऑगस्ट २०१७ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळांत मिळतील.

४. निवडणुकीची नामांकन पत्रे स्वीकारण्याची वेळ दि.८ऑगस्ट २०१७ रोजी सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत आहे.
नामांकन पत्रांची छाननी दि. ८ ऑगस्ट २०१७ रोजी सायंकाळी ७.३० वाजता करण्यात येईल.

५. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी दि. ८ ऑगस्ट २०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. नामांकन पत्र मागे घेण्याची वेळ दि. ९ ऑगस्ट २०१७ रोजी सायंकाळी ७.३० वाजेपर्यंत असेल.

६ निवडणुकीसाठी उभ्या असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी दि.१० ऑगस्ट २०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

मुलुंड, दि. १९ जुलै २०१७ — जयप्रकाश बर्वे (कार्यवाह)

**टीप : सभेनंतर सभासदांच्या स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा सभासदांनी अवश्य लाभ घ्यावा.**

## ऋणनिर्देश

मुलुंड व ऐरोलीतील सर्व स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीसखाते, मुंबई महानगर पालिका, नवी मुंबई महानगर पालिका, धर्मादाय आयुक्त, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र शासन, सिडको, वृत्तपत्रे , आकाशवाणी, दूरदर्शन, सर्व दूरचित्रवाहिन्या, सर्व वार्ताहर, आय.डी.बी.आय. बँक लि., बँक ऑफ बरोडा, ठाणे जनता सहकारी बँक लि; स्टेट बँक ऑफ इंडिया, अपना बाजार, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ग.क. खांडेकर वाचनालय, पॉप्युलर प्रकाशन, ज्येष्ठ नागरिक संघ, मुलुंड पूर्व, रोटरी क्लब ऑफ मुलुंड, श्री. दीपक शहा, बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन, दृष्टिसेवा केंद्रासाठी काम करणारे कर्मचारी, शिक्षकवर्ग, मदतनीस तसेच 'नॅब' यांचे तसेच गिरिमित्र संमेलनाचे तसेच इतर उपक्रमांचे सर्व देणगीदार, महाराष्ट्र सेवा संघाच्या सहकार्याने विविध उपक्रमांचे संयुक्त आयोजन करणाऱ्या सर्व संस्था व त्यांचे पदाधिकारी, संस्थेला विविध सेवा पुरविणारे सर्व कंत्राटदार, कामत बॅन्क्वेटस् चे श्री. सतीश कामत , वैधानिक हिशेब तपासनीस मे. सिंघवी ओतूरकर व केळकर आणि कं. मानद अंतर्गत हिशेब तपासनीस श्री. श्रीहरी भी. कुलकर्णी, श्रीमती ज्योत्स्ना जोशी, श्री. माधव शिरवळकर, 'महाराष्ट्र टाइम्स'चे श्री. अशोक पानवलकर, श्री. विलास परुळेकर, श्री.समीर कर्वे, श्री. प्रवीण मुळ्ये, श्री. चिंतामणी भिडे, श्री. अजय पाटणकर, 'लोकसत्ता' चे श्री. विनायक सुतार, श्री. विकास महाडिक, 'सकाळ' चे संपादक श्री. विजय पात्रूडकर, श्री. आनंद मते, अभ्युदय बँक, कॉर्पोरेशन बँक, स्टेट बँक ऑफ त्रावणकोर, मुलुंड व ऐरोलीचे सर्व कार्यकर्ते आणि आमचे सर्व सभासद, हितचिंतक, व संस्थेचे सर्व काम आपुलकीने करणारा आमचा मुलुंड व ऐरोली येथील कार्यालय व ग्रंथालय व्यवस्थापन , सेवक वर्ग या सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल आम्ही ऋणी आहोत.

जयप्रकाश बर्वे (कार्यवाह) — चंद्रशेखर वझे (अध्यक्ष)

**टीप -**

अहवाल अद्ययावत करण्यासाठी त्यात संस्थेतील ३० जून २०१७ पर्यंतच्या घडामोडी देण्यात आल्या आहेत याची कृपया नोंद घ्यावी. आर्थिक नोंदी मात्र ३१ मार्च २०१७ पर्यंतच्या आहेत.



Ahval text17.indd 5 2/2/2019 4:44:43 PM

**पदाधिकारी सभा - उपस्थिती तपशील**

| अनु.क्र. | पदाधिकाऱ्याचे नाव | विश्वस्त | विश्वस्त व कार्यकारी मंडळ | कार्यकारी मंडळ |
|---|---|---|---|---|
| | **एकूण सभा →** | **१** | **५** | **८** |
| १ | श्री. चं.ना.वझे | १ | ५ | ८ |
| २ | श्री.आ.रा. कट्टी | १ | २ | ४ |
| ३ | श्री.र.दे. धामणकर | १ | २ | - |
| ४ | श्री.अ.ग. करंदीकर | १ | ५ | - |
| ५ | श्री. उ.कृ.हंबर्डे | १ | ४ | - |
| ६ | श्री. कि.रा. देशमुख | १ | २ | - |
| ७ | श्री.चं.म.कुलकर्णी | - | ४ | ६ |
| ८ | श्री.ज.र.बर्वे | १ | ५ | ८ |
| ९ | श्री.ध.दि.दिवेकर | - | ४ | ४ |
| १० | श्री.र.द.लाड | - | ४ | ७ |
| ११ | श्री.अ.मो.भंडारे | - | ५ | ६ |
| १२ | श्री.वि.म. सौदागर | - | ४ | ६ |
| १३ | श्री. प्र.र. सप्रे | - | ३ | ६ |
| १४ | श्री.द.व.कुलकर्णी | - | - | - |
| १५ | श्री.वि.ज.जोगळेकर | - | २ | २ |
| १६ | श्री.वि.वा.वझे | - | २ | ४ |
| १७ | श्री.स.श्री.पाटणकर | - | ३ | ७ |
| १८ | श्री. अ.पं. गोळे | - | ५ | ८ |
| १९ | श्री.प्र.ह.सडेकर | - | ५ | ६ |
| २० | श्री.सु.वा. बागाईतकर | - | ४ | ५ |
| २१ | श्री.शं.गो.वीरकर | - | ४ | ७ |
| २२ | श्री. नितीन देशपांडे | - | १ | ५ |

सहस्रचंद्रदर्शन

**सभासदांना मिळणाऱ्या सवलती**

संस्थेच्या सभासदांस, सभासदत्वास एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर केवळ त्यांच्या स्वतःच्या किंवा त्यांच्या मुलांच्या वा मुलींच्या लग्न, मौंजीबंधन, या कार्यांसाठीच सु.ल.गद्रे सभागृहाच्या भाड्यात रु.३,०००/- व सभागृह क्र.२च्या भाड्यात रु. २,०००/-ची सूट मिळते. एका सत्रासाठी नोंदणी केल्यास अनुक्रमे रु.१,५००/- व रु.१,०००/-ची सूट मिळते. तसेच ऐरोली येथे सभागृहाच्या भाड्यात रु.१,०००/- ची सूट मिळते.



Ahval text17.indd 6 2/2/2019 4:44:44 PM

**सभासद संख्या**

| सभासद श्रेणी | मार्च१६अखेर सभासद संख्या | अहवालसाली झालेले सभासद | दिवंगत झालेले सभासद | मार्च १७ अखेरीस सभासद संख्या |
|---|---|---|---|---|
| सन्माननीय | ७ | - | - | ७ |
| आधारस्तंभ | १३ | - | - | १३ |
| आश्रयदाते | ५ | - | - | ५ |
| पत्ता माहीत नसलेले | ८१ | - | - | ८१ |
| आजीव | ६६४ | ४ | ४ | ६६४ |
| **एकूण** | **७७०** | **४** | **४** | **७७०** |

**अहवाल वर्षी सांस्कृतिक सभासद - मुलुंड येथे २२४ / ऐरोली येथे -३५**

सभागृह नोंदणीचा तपशील - अहवालवर्षी आपल्या संस्थेच्या सभागृहांत झालेले कार्यक्रम - **मुलुंड वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१व२ | सभागृह क्र.१व२ | सभांगण | सभागृह क्र.४ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ४२पू | ४१स | ८पू / स | ३७ |

**ऐरोली वास्तू**

| कार्यक्रम | सभागृह क्र.१ वातानुकूलित | सभागृह क्र.१ बिगर वातानुकूलित | तळमजला | सभागृह क्र.२ |
|---|---|---|---|---|
| लग्न,मुंज इ. प्रदर्शने, सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम | ७पू / १४स | २८पू / १९स | ४स | ४वातानुकूलित<br>१२ बिगर वातानुकूलित |

पू -पूर्ण वेळ, स-सत्रवार,

**श्रद्धांजली :**

१) मधुसूदन दातार (आजीव २४०), २) अनिल सोमण (आजीव ३०४), ३) पद्माकर सरवटे (आजीव-३७०), ४) विश्वनाथ तेंडुलकर (आजीव३७२). सर्वांना महाराष्ट्र सेवा संघ परिवारातर्फे विनम्र श्रद्धांजली!

**दादा केतकर** (आजीव १३८)**:** महाराष्ट्र सेवा संघाशी संबंधित असलेल्या प्रत्येकाच्या मनात आदराचे स्थान असलेले व्यक्तिमत्व



म्हणजे दादा केतकर! कर्तृत्व आणि दातृत्व यांचा सुरेख संगम असलेले नेतृत्व लाभलेल्या म.से. संघाची ओळख मुंबई पूर्व उपनगरात सांस्कृतिक केंद्र म्हणून आज होते आहे, त्याला कारण दादा केतकर यांच्यासारख्या पदाधिकाऱ्यांची कर्तव्यनिष्ठा! दादा केतकर यांचे संघटनाकौशल्य वाखाणण्यासारखे होते. 'पितृस्मृति व्याख्यानमाला' सारख्या अनेक नावीन्यपूर्ण कार्यक्रमांचे नेटके आयोजन त्यांनी केले. साहित्यिक-कलाकार पुरस्काराच्या निमित्ताने त्यांनी काढलेली पत्रके स्वतःच साहित्याचा मानदंड ठरतील इतकी सुरेख आहेत. या वास्तूवर, इथल्या माणसांवर, कलेवर आणि कलाकारांवर प्रेम करणाऱ्या दादा केतकरांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!

गान सरस्वती किशोरी आमोणकर, चित्रपट अभिनेते विनोद खन्ना तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक तसेच क्रीडा व चित्रपट क्षेत्रांतील ज्या व्यक्तींचे अहवालसाली निधन झाले, अशा सर्वांना महाराष्ट्र सेवा संघ परिवारातर्फे विनम्र श्रद्धांजली!

## महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व ऐरोली शाखांच्या उपक्रमांसाठी तसेच स्थिर निधीसाठी मिळालेल्या देणग्या

| अनु. क्र. | तपशील | रुपये |
|---|---|---|
| | | |
| **गिरिमित्र संमेलनासाठी** | | |
| १ | शापुरजी पालनजी | ५०,०००.०० |
| २ | कांचनजंगा माऊंटेनिअरिंग फाऊंडेशन | ५५,०००.०० |
| ३ | ईशा टूर्स | २५,०००.०० |
| ४ | इतर देणग्या | ३०,५०० |
| **आरोग्य विभागासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | आरोग्य विभाग | |
| | | |
| **विविध पुरस्कारांसाठी तसेच संस्थेच्या उपक्रमांसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्रीमती सविता गद्रे (सु.ल. गद्रे पुरस्कारांसाठी) | १,५०,०००.०० |
| २ | श्री. भा. ल. महाबळ | ५१,०००.०० |
| ३ | सुहास सहस्त्रबुद्धे | २०,०००.०० |
| ४ | राजेश चव्हाण | २०,०००.०० |
| ५ | गीता गद्रे | १५,०००.०० |
| ६ | चंद्रशेखर ना. वझे | २०,०००.०० |
| ७ | अमित ढवळे | १०,००१.०० |
| ८ | इतर देणग्या | ३,२९,६८०.०० |
| **ग्रंथालयासाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | श्री. सु.ना. पाटणकर (साहित्य साधना पुरस्कारासाठी) | २०,०००.०० |
| २ | श्री. किरण शांताराम | ३,०००.०० |
| ३ | ज्ञानेश्वर पुस्तक पेढीसाठी - अंजली जोशी | २,५००.०० |
| **दृष्टिसेवा अभ्यासिकेसाठी मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | प्रभाकर दामले | ३५,०००.०० |
| २ | मीना खाडिलकर | ६०,०००.०० |
| ३ | रश्मी जैन | ३१,०००.०० |
| ४ | किरण देशमुख | २५,०००.०० |
| ५ | ब्लॉसम चॅरिटेबल ट्रस्ट | २३,८००.०० |
| ६ | इनर व्हील क्लब | ३७,९८०.०० |
| ७ | फॉर एव्हर लिव्हिंग (संगणक) | ८२,५००.०० |
| ८ | ललित रामाणी | १५,०००.०० |
| ९ | हेमचंद्र नेमाडे | १०,००१.०० |

सहस्रचंद्रदर्शन

| | | |
|---|---|---|
| १० | मीना कदम | ११,०००.०० |
| ११ | संघमित्रा रंगारी | ११,०००.०० |
| ८ | इतर देणग्या | १,०१,५०२.०० |
| **अर्थ विभागाला मिळालेल्या देणग्या** | | |
| १ | वास्तव डेव्हलपर्स (उद्योजक पुरस्कार) | ५०,०००.०० |
| २ | हेमचंद्र नेमाडे | १०,००१.०० |
| ३ | जनकल्याण सहकारी बँक | ५,०००.०० |
| **प्रेरणा पुरस्कार** | | |
| १ | वैद्य पाटणकर फार्मसी - विलास पाटणकर | २०,०००.०० |
| २ | इतर | ८,०००.०० |
| सॅल्यूट इंडिया | | |
| १ | लार्सन अँड टूब्रो | १,५०,०००.०० |
| २ | संपदा रानडे | १,००,०००.०० |
| ३ | कॅडिला हेल्थ केअर | ५०,०००.०० |
| ४ | माझगांव डॉक | ५०,०००.०० |
| ५ | ठाणे जनता सहकारी बँक | ५०,०००.०० |
| ६ | पितांबरी प्रॉडक्ट्स | २५,०००.०० |
| ७ | मिलिंद जोशी | २०,०००.०० |
| ८ | केसरी टूर्स | २०,०००.०० |
| ९ | मकरंद जोशी | ११,०००.०० |
| १० | प्रिया सोमण | ११,०००.०० |
| ११ | इतर | १,७६,३७७.०० |
| **मैत्रेयी व साहित्य सौरभ** | | |
| १ | सिंधुताई डांगे | ५५,०००.०० |
| २ | सुषमा पाटणकर | ५०,०००.०० |
| ३ | सविता गद्रे | २५,०००.०० |
| ४ | कुंदा वैद्य | १५,०००.०० |
| ५ | इतर | २२,६००.०० |
| **संगीत महोत्सव** | | |
| १ | अश्विनी एंटरप्रायझेस - अजित करंदीकर | २,००,०००.०० |
| २ | इतर | ५,०००.०० |
| | | |
| | | |
| | | |

सहस्रचंद्रदर्शन



Ahval text17.indd 9 2/2/2019 4:44:44 PM

| संस्कृत विभागाला मिळालेल्या देणग्या | | |
|---|---|---|
| १ | श्री. जयराज साळगांवकर | २६,०००.०० |
| २ | सुमंगल प्रेस प्रा.लि. (पं.लाटकरशास्त्री पुरस्कारासाठी) | २५,०००.०० |
| ३ | इतर | ११,००१.०० |
| | | |

**संस्थेने दिलेल्या देणग्या**

| अनु. क्र. | देणगी दिलेली संस्था | देणगी रक्कम- रुपये |
|---|---|---|
| १ | महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्था | ५,०००.०० |
| २ | लक्ष्य फाऊंडेशन | १०,०००.०० |
| ३ | भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान | १०,०००.०० |
| ४ | संस्कृत संमेलन - नागपूर | १५,०००.०० |
| ५ | इतर | ४२,०००.०० |
| | | |

**महाराष्ट्र सेवा संघाचे श्रीमती सविता गद्रे पुरस्कृत विविध पुरस्कार व इतर कार्यक्रम**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | २५ सप्टेंबर २०१६ | महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार | आधार मतिमंद मुलांची शाळा, मालेगाव(नाशिक), प्र.पा. माधव शिरवळ-कर, विशेष अतिथी - यशवंत मोरे, प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग. म.शासन मुलाखत - नंदिनी गोरे, सुसंवादक |
| २ | १५ जानेवारी २०१७ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे साहित्यिक पुरस्कार | पुरस्कार प्राप्त साहित्यिक - डॉ. तारा भवाळकर प्र.पा. पद्मश्री श्री. मधु मंगेश कर्णिक, मुलाखतकार - मुकुंद कुळे, ज्यष्ठ पत्रकार |
| ३ | २६मार्च २०१७ | महाराष्ट्र सेवा संघाचा सु.ल. गद्रे कलाकार पुरस्कार | पुरस्कारप्राप्त कलाकार - अशोक सराफ प्र.पा. किरण शांताराम, मुलाखतकार : पुरुषोत्तम बेर्डे, महेंद्र तेरेदेसाई. सूत्रसंचालन : श्रेयसी वझे-मंत्रवादी |
| | | **नियमित व इतर कार्यक्रम** | |
| ४ | ८ एप्रिल २०१७ | सुनीता म.देवधर पुरस्कृत सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार | पुरस्कारप्राप्त स्त्री सामाजिक कार्यकर्त्या - प्रीती पाटकर, प्र.पा. शिरीष इनामदार, अतिरिक्त पोलिस उपायुक्त, मुलाखतकार - आरती कदम , संपादक, चतुरंग पुरवणी (लोकसत्ता) |
| ५ | ४ फेब्रुवारी २०१७ | वैद्य पाटणकर पुनर्वसन संस्था पुरस्कृत प्रेरणा पुरस्कार | कमांडर श्रीरंग एन्. बिजूर (निवृत्त) भारतीय नौदल, ले.कर्नल सुरेश पाटील, शिरीष इनामदार, अतिरिक्त पोलिस उपायुक्त, प्र. पा.श्री. य. मो. देवस्थळी. ज्येष्ठ संचालक लार्सन ॲन्ड टूब्रो. मुलाखतकार ; समीर कर्वे, ज्ये.पत्रकार. म.टा. |



Ahval text17.indd 10 2/2/2019 4:44:44 PM

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | ९ व १० जुलै २०१६ | १५ वे गिरिमित्र संमेलन | |
| ७ | १९ जुलै २०१६ | वर्षा सहल | |
| ८ | १५ ऑगस्ट २०१६ | झेंडा वंदन | |
| ९ | सप्टेंबर २०१६ | गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी सन्मान सोहळा, रोटरी क्लब ऑफ मुलुंड व अपना बाजार,मुलुंड(प.) यांच्या संयुक्त विद्यमाने | |
| १० | **२६ नोव्हेंबर, २०१६** | पं. लाटकर शास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार | **सन्मानमूर्ती : डॉ. राजेंद्र अंबादास मुळे, प्र.पा. डॉ.सिंधुताई डांगे,** |
| ११ | २६ नोव्हेंबर २०१६ | स्व. उद्धवराव त्रिविक्रम आठले स्मरणार्थ संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार | **श्री. राजेंद्र दातार व डॉ. माधव केळकर** |
| १२ | १६ नोव्हेंबर २०१६ | सु. ल. गद्रे स्मृतिदिना निमित्त -मनाासून | |
| १३ | २० नोव्हेंबर २०१६ | कलास्वाद मंडळ | |
| १४ | २१ फेब्रुवारी २०१६ | अशोक सहस्त्रबुद्धे स्मृतिप्रीत्यर्थ | |
| १५ | ७ व ८ जानेवारी२०१७ | संगीत महोत्सव | कलाकार : सावनी शेंडे, पं. सतीश व्यास, पं. ओजस प्रताप, पं.अरविंद पारिख |
| | | | |
| | | **वर्धापनदिन सोहळा** | |
| १६ | ८ नोव्हेंबर २०१६ | अभिनव कल्याण निर्मित लेझीम खेळणारी पोरे | |
| १७ | १०नोव्हेंबर, २०१६ | दिवाळी पहाट | |
| १८ | १२ नोव्हेंबर, २०१६ | दिवाळी पहाट - ऐरोली | |

सहस्रदर्शन

नमस्कार !
संस्थेला यंदा ८० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने ‘सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा’ या उपक्रमांतर्गत शनिवार, दि. ७ ऑक्टोबर २०१७ रोजी ज्येष्ठ सभासदांचा सन्मान करण्यात येणार आहे. तरी सन २०१२ नंतर वयाची पंचाहत्तरी पूर्ण करणारे संस्थेचे सभासद आपल्याला माहित असतील तर कृपया त्यांची माहिती संस्थेच्या कार्यालयात ३० सप्टेंबर २०१७ पर्यंत द्यावी ही विनंती!



Ahval text17.indd 11 2/2/2019 4:44:44 PM

# कौतुक सोहळा - गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी सन्मान

महाराष्ट्र सेवा संघातर्फे मुलुंड मधील विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आलेली विविध पारितोषिके :

**कै. राम गणेश गडकरी पारितोषिक** : मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत उच्च मराठी विषय घेऊन मराठीत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| श्रद्धा काकडे | न.ग. पुरंदरे हायस्कूल | ९४/१०० |

**महर्षी अण्णासाहेब कर्वे पारितोषिक** : मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| राधिका जोशी | सेठ करमसी कांजी | ९९.४० % |

**कै. अंबादास डांगे पारितोषिक** : मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत संस्कृत या विषयात सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| वरुण व्यं.अय्यर | आय.ई.एस. सेकंडरी स्कूल | १०० |
| राधिका जोशी | सेठ करमसी कांजी | १०० |
| मालव संघवी | सेठ करमसी कांजी | १०० |
| वृद्धी शहा | सेठ करमसी कांजी | १०० |
| साक्षी प्रजापती | सेठ करमसी कांजी | १०० |
| प्रथमेश अय्या | सेठ करमसी कांजी | १०० |
| वत्सल जैन | सेठ करमसी कांजी | १०० |

**श्री. सु.ल. गद्रे पारितोषिक** : मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील महानगर पालिकेच्या माध्यमिक मराठी विद्यालयातून सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| पूजा महिंद्र | मुलुंड म्युनिसिपल स्कूल | ७२.४ % |

**कै. विठ्ठलराव व कै. सुशीला घाटणेकर पारितोषिक** : मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| राधिका जोशी | सेठ करमसी कांजी | ९९.४० % |

**सौ सुषमा केतकर पारितोषिक :** मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| राधिका जोशी | सेठ करमसी कांजी | ९९.४० % |

**कै. डॉ. सदाशिव अं. डांगे स्मृती पारितोषिक :** मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंडमधील शाळांतून प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थ्यात व प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| राधिका जोशी | सेठ करमसी कांजी | ९९.४० % |
| मालव संघवी | सेठ करमसी कांजी | ९९.०० % |

**कै. हरेश्वर केशव लोखंडे स्मृती पारितोषिक** : मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील माध्यमिक शाळांतून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| प्रवीण यादव | मुलुंड म्युनिसिपल स्कूल -हिंदी | ७८.८० % |

**कै. मुरलीधर सुका चौधरी पारितोषिक** : मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत मुलुंड मधील शाळांतून गणित विषयात उत्तम गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस,

| | | |
|---|---|---|
| मालव संघवी | सेठ करमसी कांजी | १०० |
| वृद्धी शहा | सेठ करमसी कांजी | १०० |



Ahval text17.indd 12 2/2/2019 4:44:44 PM

कै.ऋषिकेश जोशी पारितोषिक : मार्च २०१६ मध्ये झालेल्या शालांत परीक्षेत संस्कृत विषयात १०० गुण मिळविलेल्या विद्यार्थी/विद्यार्थिनीस :

| | | |
|---|---|---|
| वरुण व्यं.अय्यर | आय.ई.एस. सेकंडरी स्कूल | १०० |
| राधिका जोशी | सेठ करमसी कांजी | १०० |
| मालव संघवी | सेठ करमसी कांजी | १०० |
| वृद्धी शहा | सेठ करमसी कांजी | १०० |
| साक्षी प्रजापती | सेठ करमसी कांजी | १०० |
| प्रथमेश अय्या | सेठ करमसी कांजी | १०० |
| वत्सल जैन | सेठ करमसी कांजी | १०० |

## संस्कृत विभाग

गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष) मुग्धा गोळे (कार्यवाह)

**सदस्य :** चं. ना. वझे, चं.म. कुलकर्णी, सुमेधा नवाथे,भावना दांडेकर, प्रसाद भिडे, प्रसाद गोडसे

१) ५५ व्या महाराष्ट्र राज्य संस्कृत नाट्यस्पर्धेत प्रथम पारितोषिक विजेत्या संस्थेच्या ‘अक्षगानम्’ या नाटकाचा विशेष प्रयोग दि.१७ ऑगस्ट, २०१६ रोजी रवीन्द्र नाट्य मंदिर, मुंबई येथे सादर करण्यात आला. या महोत्सवात नाटकाला मिळालेल्या पुरस्कारांचेही वितरण झाले.

२) प्रतिवर्षीप्रमाणे संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या ‘कै. वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार’ व ‘स्व. अुद्धवराव त्रिविक्रम आठले संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार’ प्रदान सोहळा २६ नोव्हेंबर, २०१६ रोजी आयोजित करण्यात आला होता. या वर्षी लाटकरशास्त्री पुरस्काराने पुणे येथील डॉ. राजेंद्र अंबादास मुळे यांना गौरविण्यात आले. तसेच बदलापूर येथील श्री. राजेंद्र दातार व पुणे येथील डॉ. माधव केळकर यांना संस्कृत भाषा प्रसार पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद डॉ.सिन्धुताई डांगे यांनी भूषविले.

३)जानेवारी २०१७ मध्ये महाराष्ट्र राज्य संस्कृत नाट्यस्पर्धेसाठी सेवा संघाच्या कलाकारांनी एक आगळ्यावेगळ्या धाटणीचा ‘देवशुनी’ या नाटकाचा प्रयोग सादर केला. पोवाड्याच्या अंगाने कथा सांगताना काही भाग नवनाट्याच्या पद्धतीने सादर केला होता. या नाटकातील कलाकार श्री तक्षिल खानविलकर यांना ‘सुपर्ण’ या भूमिकेसाठी रौप्यपदक जाहीर झाले आहे. या नाटकाच्या प्रयोगाला पुण्यामधील प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. प्रेक्षकांपैकी एक ज्येष्ठ महिला श्रीमती काळे यांनी सर्व कलाकारांचे कौतुक म्हणून रोख रुपये ५००/- दिले. ही आमच्या कलाकारांना प्रोत्साहन देणारी घटना पुढील काळातील उपक्रमांना बळ देईल.

४) संस्कृत विभागाचे मार्गदर्शक पं. प्रभाकर भातखंडे यांनी लिहिलेला ‘देवशुनी’ हा संस्कृत पोवाडा महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक निर्मिती महामंडळाने अभ्यासक्रमात घेतला आहे.

५) संस्कृत रसास्वाद वर्ग : दर गुरुवारी संस्थेच्या सभागृहात गेली ३१ वर्षे अव्याहतपणे सुरू असणारा रसास्वाद वर्ग ही संस्थेकडून समाजाला मिळालेली देणगीच! या वर्षी ४३ वर्ग झाले. या वर्गात ब्रह्मसूत्रातील पहिल्या अध्यायातील १९ सूत्रे, गंगाष्टकम्, सप्तपदीचे मंत्र व विवाह विधीतील काही मंत्र शिकवण्यात आले.

६) आपल्या संस्थेच्या प्रेरणेने सुरू झालेला संस्कृत संमेलनाचा उपक्रम या वर्षी नागपूर येथील कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यापीठाने आयोजित केला होता. या संमेलनासाठी महाराष्ट्र सेवा संघातर्फे रु. १५,०००/- देणगी म्हणून देण्यात आले तसेच संमेलनासाठी संस्कृत विभागाचे मार्गदर्शक पं. प्रभाकर भातखंडे व संस्कृत रसास्वाद वर्गाचे विद्यार्थी उपस्थित होते.

मुग्धा गोळे (कार्यवाह) गुरुप्रसाद कार्लेकर (अध्यक्ष)



Ahval text17.indd 13 2/2/2019 4:44:44 PM

# आरोग्य विभाग

र. दे. धामणकर - अध्यक्ष, प्र.र. दामले - कार्यवाह
**सदस्य :** अ.मो. भंडारे, वि. म. सौदागर, अ.पं. गोळे, वि.स. जोशी, सु.ह.बागाईतकर

संस्थेच्या आरोग्य विभागातर्फे ' बॉम्बे मेडिकल एड फाऊंडेशन' च्या सहकार्याने मॉडेल टाऊन, मुलुंड (प) येथे आरोग्य केंद्र आणि भौतिक उपचार(Physio Therapy) केंद्र चालविले जाते. या ठिकाणी अल्प उत्पन्नातील रुग्णांना अत्यंत माफक दरात औषधे व अन्य आरोग्य सेवा पुरविल्या जातात. आरोग्य विभागाचे अध्यक्ष व कार्यवाह व अन्य सभासद वेळोवेळी केंद्राला भेट देऊन व्यवस्थेची पाहणी करतात. या केंद्राला औषधे तसेच अन्य सामुग्री पुरविली जाते.
सध्या त्या वास्तूचे नूतनीकरण चालू आहे त्या विषयीचे सविस्तर वृत्त पुढील वार्षिक अहवालात येईलच .
अहवाल वर्षात खालील कार्यक्रम आयोजित करण्यात आले :
१) दि. २३.६.१६ : योग एक जीवनशैली – जागतिक योगदिनानिमित्त पतंजली मुनींनी योग सूत्रात वर्णिलेल्या अष्टांग योगावर आधारित व्याख्यान . व्याख्यात्या सुजाता साठे ( कैवल्यधाम मुंबईच्या पदविका धारक, योग अध्यापनाचा अनुभव तसेच 'न्यूरो सायन्स ऑफ योगा'च्या साहाय्याने रुग्णांवर उपचार करण्याचा अनुभव असलेल्या )
२) १८ सप्टेंबर २०१६ योगाचार्य श्रीकृष्ण व्यवहारे यांच्या 'सूक्ष्म योग' या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम झाला. डॉ. उल्का नातू ( एम.डी.) व पद्मश्री पद्मजा फेणाणी -जोगळेकर यांची उपस्थिती व मार्गदर्शन लाभले.
२) ५ नोव्हेंबर २०१६ : डॉ. ज्योती सावंत यांनी 'थायरॉईड - एक आजार , लक्षणे व उपचार' या आजारासंबंधी दृक्श्राव्य सादरीकरण केले व उपस्थितांना विषय सहज सोप्या भाषेत समजावून सांगत श्रोत्यांच्या शंकाचे निरसनही केले.
३) २९ जानेवारी २०१७ – डॉ. श्रीराम आपटे - होमियोपथिक डॉ. यांचे 'मी चा शोध , तणाव आणि उपाय'
डॉ. वृषाली देशमुख - होमियोपथी – आपले शरीर आणि मन , डॉ. स्वप्नील पाटणे - रोग म्हणजे काय – पर्यायी वैद्यक
या तीन होमिओपथी डॉक्टरांची वरील विषयावर दृक्श्राव्य सादरीकरणासह व्याख्याने झाली.

प्र. र. दामले , कार्यवाह र.दे धामणकर, अध्यक्ष

# आपुलकी

संपादक - चंद्रशेखर वझे, कार्यकारी संपादक - सुषमा पाटणकर, संपादन साहाय्य : दत्तात्रय व. कुलकर्णी, विनोद सौदागर, रवींद्र लाड, नंदिनी हंबर्डे , रजनी करंदीकर, अरुण भंडारे.

'आपुलकी' या त्रैमासिक मुखपत्राची वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे. या अहवाल वर्षात दिवाळी अंकासहित चारही आवृत्यांमध्ये विविध विषयांवरील लेख, मुलुंड वा मुलुंड परिसरातील यशस्वी व्यक्तींचे परिचय, आरोग्य, संगीत, भाषा, नाट्य, सामाजिक समस्या इ. विषयांवरील सकस लेख प्रसिद्ध झाले; थोडक्यात सांगायचे झाल्यास 'आपुलकी'च्या धोरणास अनुसरून सकारात्मक, विधायक, व प्रेरक अशा विषयांवरील साहित्य प्रसिद्ध करण्यात आले. उपक्रमाला वाचकांचा चांगला प्रतिसाद लाभतो आहे.

सुषमा पाटणकर,
कार्यकारी संपादक, आपुलकी



Ahval text17.indd 14 2/2/2019 4:44:44 PM

# मैत्रेयी- महिला विभाग

माधवी भुसारी( अध्यक्ष), प्रियांका मोकाशी (कार्यवाह), रजनी करंदीकर (सहकार्यवाह )
सदस्य : सुषमा पाटणकर, सुनीता देवधर, इंदिरा कुलकर्णी, वासंती वैद्य, नंदिनी हंबर्डे, रश्मी अनगळ, वीणा नाटेकर, मेधा देव.

यावर्षी मैत्रेयीच्या त्रिदशकपूर्ती निमित्त ऑक्टोबर मध्ये 'साहित्य सौरभ' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमांतर्गत दोन दिवसीय लेखिका संमेलन यशस्वीरित्या संपन्न झाले. दर महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या मंगळवारी अक्षरमैत्री या उपक्रमांतर्गत विविध विषयांवर कार्यक्रम सादर केले गेले. यामध्ये इतर मान्यवरांबरोबरच स्थानिक महिलांनीही कार्यक्रम सादर केले. अहवाल वर्षाचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे होते.

मंगळवार दि. ७ जून, २०१६ : मुक्तसंवाद या कार्यक्रमांतर्गत मैत्रिणींनी विविध क्षेत्रातले अनुभव सांगितले. अनुया पालव यांनी पार्ल्याच्या लोकमान्य सेवा संघातील जेष्ठ नागरिकांशी संवाद साधण्यासाठी कार्यरत असलेल्या दिलासा या उपक्रमाविषयी माहिती सांगितली. तसेच दिप्ती कुलकर्णी यांनी नेदरलँडविषयी व रजनी करंदीकर यांनी जपानविषयी माहिती सांगितली.

मंगळवार दि. २१ जून, २०१६ : आयत्यावेळी दिलेल्या 'मी परंपरा अशा मोडल्या' या विषयावर उपस्थित मैत्रिणींनी आपले विचार मांडले.

मंगळवार दि. ५ जुलै, २०१६ : 'नभ उतरू आलं' या कार्यक्रमांतर्गत पाऊस या विषयावर आधारित कविता, गाणी, लेख यांनी परिपूर्ण असा कार्यक्रम मैत्रेयीने सादर केला. रश्मी अनगळ यांच्या अभ्यासपूर्ण निवेदनामुळे कार्यक्रमाची रंगत वाढली.

मंगळवार दि.१९ जुलै, २०१६ : ज्येष्ठ पत्रकार नीला उपाध्ये यांनी पत्रकारितेतील अनुभवांबरोबरच उपस्थित मैत्रिणींना मार्गदर्शन केले.

मंगळवार दि. २ ऑगस्ट,२०१६ : गुरुशिष्य परंपरेतील 'अग्निशिखा' या कार्यक्रमांतर्गत रामदासस्वामी-वेणाई, स्वामी विवेकानंद -भगिनी निवेदिता आणि सुभाषचंद्र बोस - कॅ.लक्ष्मी सेहगल या गुरुशिष्यांविषयी आशा येल्लापूरकर यांनी विवेचन केले.

मंगळवार दि. १६ ऑगस्ट, २०१६ : 'संस्कृतीरंग - जर्मनी' या दृकश्राव्य कार्यक्रमात ईशा पटवर्धन या छोट्या मैत्रिणीने 'स्टुडंट एक्सचेंज ' उपक्रमांतर्गत आलेले अनुभव सांगितले. रजनी करंदीकर यांनी ईशाशी संवाद साधला.

मंगळवार दि. २० सप्टेंबर, २०१६ : 'मंत्रयोगाची ओळख' या कार्यक्रमांतर्गत अस्मिता गोखले यांनी पाच महत्त्वाच्या मंत्रांविषयी माहिती सांगितली व त्या मंत्रांचे आपल्या आयुष्यातील महत्त्व विशद केले.

मंगळवार दि. २७ सप्टेंबर, २०१६ : मैत्रेयीच्या ३० व्या वर्धापनदिनानिमित्त 'चित्रकथा' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शित केलेल्या ५ चित्रांपैकी एका चित्रावर आधारित कथा लिहिण्याची संधी मैत्रिणींना मिळाली. स्पर्धेत एकूण १७ मैत्रिणींनी भाग घेतला होता. सौ. सुषमा केतकर व प्रा. वीणा सानेकर यांनी कथांचे परीक्षण केले.

मंगळवार दि. ४ ऑक्टोबर, २०१६ : मुलुंडमधील सर्व महिला मंडळांच्या सहभागाने ५३ वा 'शारदोत्सव' उत्साहात साजरा झाला. यात दोन कार्यक्रम सादर करण्यात आले. १) ऐका देवी तुमची कहाणी - वक्त्या - प्रा. मंजुषा गोखले. २) यशवंत संध्या - सुप्रसिध्द लेखक य.गो.जोशी यांच्या चित्रपटांवर आधारित हा संगीतमय कार्यक्रम सादर केला त्यांची कन्या अंजली पेंडसे व सहकलाकारांनी. सहभागी मंडळे : १)मैत्रेयी २) कल्पना विहार महिला मंडळ ३) आराधना महिला मंडळ ४) चित्तपावन ब्राह्मण महिला मंडळ ५) रुद्राणी पुरोहिता मंडळ ६) देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण महिला मंडळ ७) राष्ट्र सेविका समिती

शनिवार व रविवार दि. १५ व १६ ऑक्टोबर, २०१६ : मैत्रेयीच्या त्रिदशकपूर्तीनिमित्त 'साहित्य सौरभ' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार दि. १५ रोजी ज्येष्ठ लेखिका मंगला गोडबोले, छाया महाजन व उषा तांबे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सोहळ्याची सुरुवात झाली. त्यानंतर या लेखिकांनी, .....आणि मी लिहू लागले या कार्यक्रमात आपल्या लेखनामागच्या प्रेरणेविषयी विवेचन केले. दुसरा कार्यक्रम होता आनंद अनुवादाचा या कार्यक्रमात सविता दामले, अरुणा दुभाषी व अनुपमा उजगरे यांनी अनुवादाच्या क्षेत्रातील अनुभव सांगितले. रविवार दि. १६ रोजी वारसा लेखनाचा या कार्यक्रमात ज्येष्ठ लेखक म.सु.पाटील यांची सुकन्या नीरजा, व.पु. काळे यांची सुकन्या स्वाती चांदोरकर व मंगला गोडबोले यांची सुकन्या मुग्धा गोडबोले यांनी, आपल्या आई-वडिलांचे लाभलेले मार्गदर्शन व स्वत:चे लेखनविषयक अनुभव सांगितले. अभिव्यक्तीची विविध रूपे या परिसंवादात संगीत,चित्रपट,चित्रकला व नृत्य या अभिव्यक्तीच्या विविध माध्यमांविषयी अनुक्रमे सुलभा पिशवीकर, मीना कर्णिक, साधना बहुलकर व निलीमा कढे यांनी विवेचन



Ahval text17.indd 15 2/2/2019 4:44:45 PM

केले. या परिसंवादाचे वंदना बोकील-कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. साहित्य सौरभ कार्यक्रमात चित्रकथा स्पर्धेचा निकाल घोषित करण्यात आला व विजेत्यांना पारितोषिकेही दिली गेली. निकाल पुढीलप्रमाणे - प्रथम क्रमांक - प्रज्ञा गोखले, द्वितीय क्रमांक - विभावरी शिंदे, उत्तेजनार्थ पारितोषिक - वैशाली घांग्रेकर.

मंगळवार दि. १५ नोव्हेंबर, २०१६ : 'चित्रकथा' स्पर्धेतील विजेत्यांच्या कथांचा अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमाला परीक्षक सौ. सुषमा केतकर व प्रा. वीणा सानेकर उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थितांना कथालेखनाबद्दल मार्गदर्शन केले.

मंगळवार दि. ६ डिसेंबर, २०१६ : 'वाचनानंद' या कार्यक्रमात दिवाळी अंकातील आवडलेल्या कविता, कथा, लेख याबद्दल उपस्थित मैत्रिणींनी आपले विचार मांडले.

मंगळवार दि. २० डिसेंबर, २०१६ : कवीवर्य मंगेश पाडगावकर यांच्या प्रथम स्मृती-दिनानिमित्त, 'मागे उभा मंगेश पुढे उभा मंगेश' हा विशेष कार्यक्रम सादर करण्यात आला. कार्यक्रमाची संकल्पना होती मैत्रेयीच्या रश्मी अनगळ यांची व कार्यक्रमात रश्मी अनगळ, नंदिनी हंबर्डे व वीणा नाटेकर यांचा सहभाग होता. मंगेश पाडगावकरांच्या काहीशा अपरिचित कविता व इतर साहित्याचा कार्यक्रमात समावेश करण्यात आला होता.

मंगळवार दि. ३ जानेवारी, २०१७ : 'नातेसंबंध - ग्रह आणि आग्रह' या कार्यक्रमात मानसशास्त्रज्ञ डॉ.केतकी गद्रे यांनी मार्गदर्शन केले.

मंगळवार दि. १७ जानेवारी, २०१७ : 'चिरतारुण्याचा आरसा' या कार्यक्रमांतर्गत प्रा. रेखा दिवेकर यांनी 'अँटी एजिंग'विषयी मार्गदर्शन केले.

रविवार दि. २२ जानेवारी, २०१७ : मैत्रेयीचे ३० वे स्नेहसंमेलन सकाळी ९.३० ते सायंकाळी ६ या वेळेत संपन्न झाले.

स्नेहसंमेलनात पुढीलप्रमाणे कार्यक्रम होते. १) यावर्षीच्या कै.सौ. प्रभावती पागे पुरस्काराच्या मानकरी होत्या, पत्रकार मृण्मयी रानडे. महाराष्ट्र टाइम्समधील ज्येष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी यांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. २) उत्तररंग या कार्यक्रमात सुप्रसिध्द गायिका उत्तरा केळकर यांची सांगीतिक मुलाखत घेतली ,'अस्मिता वाहिनी'वरील सुप्रसिद्ध निवेदिका पूर्वा कर्वे यांनी. हार्मोनियमवर पं. अप्पा वढावकर व तबल्यावर आर्चिस लेले यांनी त्यांना संगीतसाथ दिली. ३) दुपारच्या सत्रात वि.वा.शिरवाडकर व सदाशिव अमरापूरकर लिखित 'दृष्टीबाधितांचे दैवत' असलेल्या हेलन केलर यांच्या जीवनावर आधारित 'किमयागार' हे दोन अंकी नाटक सादर झाले.दिग्दर्शिका होत्या संपदा जोगळेकर-कुलकर्णी. यातील कलाकार होते तृष्णिका शिंदे, संपदा जोगळेकर-कुलकर्णी, अंगद म्हसकर, पल्लवी वाघ-केळकर, वैजयंती शिंदे.

मंगळवार दि. ७ फेब्रुवारी, २०१७ : विविध खिडक्यांतून जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन देणारा 'खिडकी ' हा कार्यक्रम, ठाण्याच्या गीता सुळे यांनी सादर केला.

मंगळवार दि. ७ मार्च, २०१७ : महिलादिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात 'पोलीस तपास यांच्या नजरेतून' या कार्यक्रमांतर्गत गुन्हेगारांची रेखाचित्रे काढणाऱ्या दिप्ती कांबळे व मुलुंड पश्चिम येथील पोलीस स्टेशनमधील महिला पोलीस अधिकारी गीतांजली जगताप यांची वीणाताई नाटेकर यांनी मुलाखत घेतली. दिप्ती कांबळे यांनी रेखाचित्राचे प्रात्यक्षिक दाखविले.

शुक्रवार दि. २४ मार्च २०१७ : महिलादिनानिमित्त दुसऱ्या विशेष कार्यक्रमात आय.एफ.एस. ऑफिसर डॉ.स्वाती कुलकर्णी यांच्याशी 'आकाशवाणी'वरील कार्यक्रम अधिकारी नेहा खरे यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या.

मंगळवार दि. ४ एप्रिल, २०१७ : 'कथा-त्रिवेणी' या कार्यक्रमांतर्गत नवीन पिढीच्या लेखिकांच्या स्वलिखित कथांच्या अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यामध्ये राजश्री बर्वे, चित्रा वाघ व प्रा. छाया पिंगे सहभागी झाल्या होत्या.

मंगळवार दि. १८ एप्रिल, २०१७ : वासंतिक मेळाव्यानिमित्त 'सावित्री' या पु.शि.रेगे यांच्या कादंबरीवर आधारित एकपात्री नाट्याविष्कार सादर करण्यात आला. अभिनेत्री प्रिया जामकर यांच्या नृत्याभिनयामुळे एक अप्रतिम नाट्यानुभव मिळाला. नाट्याविष्काराचे दिग्दर्शन श्री. रवींद्र लाखे यांनी केले होते.

मंगळवार दि. २५ एप्रिल, २०१७ : खास लोकाग्रहास्तव प्रा. रेखा दिवेकर यांच्या 'चिरतारुण्याचा आरसा' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये योगासने, न्युरो-मस्क्युलर व्यायाम, आहार नियोजन व पौष्टिक अल्पोपहार या गोष्टींचा समावेश होता. कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाला.

प्रियांका मोकाशी, कार्यवाह — माधवी भुसारी, अध्यक्ष



Ahval text17.indd 16 2/2/2019 4:44:45 PM

# कला विभाग



अ.मो.भंडारे - (अध्यक्ष), वि.म.सौदागर (कार्यवाह)

सदस्य - चं.म. कुलकर्णी, प्रदीप नाटेकर, द.व. कुलकर्णी, र. द. लाड , स. श्री. पाटणकर, प्रकाश सडेकर, मेधा दिवेकर, मुग्धा गोळे, श्रेयसी वझे-मंत्रवादी. सुषमा पाटणकर

पहिलाच कार्यक्रम २४ जून २०१६ रोजी यंदा मराठी भावगीतांना ९० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल प्रसिद्ध गायक विनायक जोशी आणि त्यांचे सहकारी यांचा 'मराठी भावगीतांची वाटचाल'(सांगीतिक वाटचाल) हा कार्यक्रम सादर करण्यात आला. दरम्यानच्या काळात भावगीतांमध्ये झालेली स्थित्यंतरे प्रात्यक्षिकांसह उलगडून दाखविण्यात आली.

६ ऑगस्ट२०१६ : संस्थेचे माजी अध्यक्ष डॉ. मा.गो. खांडेकर यांच्या कुटुंबीयांनी प्रायोजित केलेला, 'एक कलाकार एक संध्याकाळ' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमात कारकिर्दीचा बहर ओसरलेले, प्रसिद्धीपासून दूर गेलेले काही नामवंत रसिकांसमोर आणले जातात. या वेळचे मानकरी होते बुजूर्ग पत्रकार दिनू रणदिवे(वय ९३ वर्षे). या कार्यक्रमात श्री रणदिवे यांनी काही आठवणी, अनुभव, किस्से रसिकांना ऐकविले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार दिनकर गांगल होते.

शनिवार, दि.३० जुलै २०१६ : 'वारी पंढरीची' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यात डॉ. शैलेश भिडे यांचे 'गो विज्ञान' या विषयावर व्याख्यान झाले व नंतर रिंगण, हरिपाठ इ. कार्यक्रम झाला.

१४ ऑगस्ट २०१६ : प्रसिद्ध निरूपणकार, अभ्यासक सौ. धनश्री लेले यांनी 'भा. रांनी भारावलेले आपण' हा राजकवी भा.रा. तांबे व त्यांची भावगीते यावर आधारीत कार्यक्रम सादर केला. गायन साथ मधुरा नामजोशी यांची होती. विषयाची व्याप्ती, रसाळ निरूपण व भा. रांची प्रतिभा यांमुळे प्रेक्षकांनी हा कार्यक्रम अक्षरशः डोक्यावर घेतला.

२० ऑगस्ट, २७ ऑगस्ट व ३ सप्टेंबर २०१६: माजी आमदार, प्रसिद्ध विचारवंत, अभ्यासक डॉ. अशोक मोडक यांची अनुक्रमे डॉ. आंबेडकर व भारतीय एकात्मता, पंतप्रधान मोदी व त्यांचे परराष्ट्र धोरण (दोन भागांत)या विषयांवरील व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. जाणकार, सुबुद्ध नागरिकांच्या उपस्थितीने कार्यक्रमाची रंगत वाढली.

२८ ऑगस्ट १६ : 'मनःस्पर्शी' हा गणेश आचवल, रश्मी वारंग व मयुरेश शिर्के या प्रसिद्ध रेडिओ जॉकीजचा प्रात्यक्षिक, अनुभव, किस्से यांवर आधारीत कार्यक्रम सादर करण्यात आला. आयत्या वेळी विषय मिळूनही कार्यक्रम रंजक व रसिकांपपर्यंत पोहोचविणारे कार्यक्रम कसे सादर केले जातात यांची प्रात्यक्षिके उत्कंठावर्धक व प्रशंसनीय होती.

दि.२२,२३ व २४ सप्टेंबर १६ : कै. लक्ष्मणराव महाबळ पितृस्मृती व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती व यावेळच्या व्याख्यानांचा मध्यवर्ती विषय होता,' पोवाडे'. लोककलेचा हा प्रकार स्वातंत्र्यपूर्व काळात जनजागृतीचे महत्त्वाचे साधन म्हणून वापरला गेला व त प्रयत्न यशस्वीही झालेला दिसतो. मात्र लोकांच्या भावना चेतविणारा व जनसामान्यांमध्ये स्फूर्तीचे स्फुल्लिंग फुलविणारा हा कलाप्रकार सध्या स्मृती आड गेल्यासारखा दिसतो व त्यामुळे आजच्या पिढीला या कलाप्रकाराची ओळख करून देत आधीच्या पिढीला मागील इतिहासाची आठवण करून देण्यासाठी हा विषय निवडण्यात आला. या व्याख्यानांच्या निमित्ताने आपल्या शाहिरीने आपला काळ गाजवलेले शाहीर अमरशेख, आत्माराम पाटील व अण्णाभाऊ साठे यांचे स्मरण करण्यात आले. त्याचा तपशील खालील प्रमाणे :-

१) शाहीर अमरशेख - व्याख्याते शाहीर निशांत शेख व श्रीमती केशर शेख

२)शाहीर आत्माराम पाटील - व्याख्याते शाहीर प्रकाश कामत व सहकारी

३) शाहीर अण्णाभाऊ साठे - व्याख्याते शाहीर भोरे (समन्वयक -प्रकाश कामत)व्याख्यानांचा विषय व सादरीकरण रसिकांना भावल्याचे आढळले.


१८ फेब्रुवारी २०१७: 'साज और आवाज' हा श्री. अंकुश चिंचणकर यांचा हिंदी चित्रपटसृष्टीतील नामवंत संगीतकार राहुलदेव बर्मन यांच्या संगीतावर तसेच त्यांनी वापरलेली विविध वाद्ये व त्यांनी केलेले विविध प्रयोग यांवर आधारित संगीतप्रधान कार्यक्रम सादर करण्यात आला. व रसिकांनी उत्तम प्रतिसाद देऊन तो यशस्वीही केला.

१८ मार्च १७ : 'जनप्रिय यक्षगान कला मंडळ,कुर्ला' या संस्थेचा 'यक्षगान' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. विषय होता सर्वांना परिचित असा, 'नरकासूर वध' या कार्यक्रमाच्या सादरीकरणात संस्थेचे कंत्राटदार श्री. सतीश कामत यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

विनोद सौदागर, कार्यवाह

अरुण भंडारे, अध्यक्ष

## संगीत महोत्सव



संस्थेच्या वतीने आत्तापर्यंत  पाच 'स्वरझंकार महोत्सव 'आजवर संपन्न झाले होते. अभिजनांचा उत्तम प्रतिसाद लाभल्यामुळे यंदाही ६ वा 'संगीत  महोत्सव' साजरा झाला. कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणेः
शनिवार, दि.७ जानेवारी२०१७ - सावनी शेंडे (गायन), पं. सतीश व्यास (संतूर)
रविवार, दि.८ जानेवारी २०१७ - पं.ओजस प्रताप (गायन) व पं. अरविंद पारिख व (सतार)
या कार्यक्रमाला 'वास्तव ग्रुप' चे प्रायोजकत्व लाभले होते.

## महाराष्ट्रातील गिर्यारोहकांचे १५ वे गिरिमित्र संमेलन

१५ व्या गिरिमित्र संमेलनाची संकल्पना एकदम  अनोखी होती. ती म्हणजे 'महिला आणि गिर्यारोहण'!
महिलांचा गिर्यारोहणातील सहभाग नेमका आहे तरी कसा? गिर्यारोहणाची वाट महिलांसाठी बिकट आहे की वहिवाट आहे? सह्याद्री आणि एव्हरेस्ट शिखरांवर आतापर्यंत महाराष्ट्रातील किती महिलांनी भाग घेतला? अथवा किती मुली डोंगर भटकंती - ट्रेकिंगचा अनुभव घेत आहेत? गिर्यारोहणासारख्या शारीरिक, मानसिक क्षमतांचा कस लागणाऱ्या या क्षेत्रात महाराष्ट्रातील किती महिलांचा सहभाग आणि सातत्य आहे? इ. प्रश्नांवर आधारित 'महिला आणि गिर्यारोहण' असा विषय म.से. संघाच्या गिरिमित्र संमेलनात घेण्यात आला.



त्या करिता सह्याद्रीत भ्रमंती आणि आरोहण करणाऱ्या सर्व महिलांना एकत्रित करण्यात आले. त्यांची एक विशेष चित्रफीत करण्यात आली. यातील काही महिलांवर हे संमेलन घेण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आणि ही जबाबदारी त्यांनी यशस्वीपणे पेलली.
या संमेलनासाठी हिमालयातील यशस्वी गिर्यारोहण करणाऱ्या महिलांना सन्माननीय अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले. त्यात 'के टू' वर आरोहण करणारी व तीन वेळा एव्हरेस्टवर यशस्वी चढाई करणारी माया शेर्पा, तीन वेळा एव्हरेस्ट सर करणारी अंशु जामसेनपा, दोनदा एव्हरेस्टवीर झालेली संतोष यादव, आजवर १७ हिमशिखरांवर आरोहण करणारी सुमन कुटियाल या तर होत्याच, पण देशातील महिला गिर्यारोहणाच्या अध्वर्यू असलेल्या , ३२ अवघड हिमशिखरांवर यशस्वी मोहिमा केलेल्या पद्मश्री, नॅशनल अॅवॉर्ड  फॉर अॅडव्हेंचर, तेनजिंग नोर्गे अॅडव्हेंचर अॅवॉर्ड आणि अर्जुन पुरस्काराने सन्मानित श्रीमती चंद्रप्रभा ऐतवाल यांनी संमेलनाचे अध्यक्षपद भूषवून म.से.संघाच्या गिर्यारोहणासाठीच्या या उपक्रमाला गिर्यारोहणाबद्दलचा जागतिक दर्जा मिळवून दिला.
या संमेलनास ट्रेकर आणि पोलिस अधिकारी डॉ.रश्मी करंदीकर - ठाणे पलिस उपायुक्त, या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.
डोंगर भटकंतीचं वेड असलेली अभिनेत्री ऋतुजा बागवे या संमेलनाला आवर्जून उपस्थित होती. कर्नाटकातून आलेली व वयाने सर्वात लहान असलेली एव्हरेस्टवीर मालवथ पूर्णा हिलासुद्धा आमंत्रित करून तिचा सत्कार करण्यात आला.
संमेलनात चंद्रप्रभा ऐतवाल, संतोष यादव, माया शेर्पा, अंशू जानसेनपा, सुमन कुटीयाल, मालवथ पूर्णा यांचे अनुभव जाणून घेण्यासाठी मुलाखती, प्रश्नोत्तरे आणि मोहिमांच्या चित्रफिती दाखविण्यात आल्या. सह्याद्रीतील महिला गिर्यारोहकांच्या मोहिमांचा आढावा घेणारी एक दृक्श्राव्य चित्रफीतही दाखविण्यात आली. त्यास अजित भुरे यांचा आवाज लाभला होता. ही चित्रफीत सुहास जोशी, पत्रकार यांनी केली होती.
१५ व्या गिरिमित्र संमेलनात एव्हरेस्टवीर ह्रषिकेश यादव यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर इतर संस्थांनाही नेहमीच्या प्रथेनुसार गौरविण्यात आले.
प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही गिर्यारोहण विशेष  मोहिमा व सन्मानात -'दी हिमालयन क्लब', गिरप्रिमी गिर्यारहण (पुणे), प्रस्तरारोहण मोहिमा सत्कार, ट्रेकर ब्लॉगर, छायाचित्रण, पोस्टर स्पर्धा, प्रश्नमंजुषा हे उपक्रम सादर झाले.

खालील महिलांनी हे संमेलन यशस्वी करून दाखविले.



Ahval text17.indd 18 2/2/2019 4:44:45 PM

**महिला संमेलन समिती :**

| | |
|---|---|
| साधना वीरकर | गिरिविहंग ट्रेकर्स |
| अनामिका वाळवेकर | शैलभ्रमर |
| नयना आघारकर | ट्रेकक्षितिज |
| त्रिवेणी पाटील | निसर्गमित्र |
| गायत्री बोईड | निसर्गमित्र |
| अरुणा लागू | यूथ होस्टेल |
| दीपाली भोसले | यूथ होस्टेल, कांदिवली |
| छाया बोर्लीकर | नेचर लव्हर्स |
| अपर्णा भट्टे | यूथ होस्टेल,अंबरनाथ |
| प्रिसिलिया मदन | निसर्गमित्र |
| संध्या वेलणकर | कैवल्य ॲडव्हेंचर्स |
| मेधा वालावलकर | कैवल्य ॲडव्हेंचर्स |
| प्रीती पटेल | ऑफबीट सह्याद्री ट्रेकर्स |
| पल्लवी वर्तक | शैलभ्रमर |

स्वप्नाली धाबुगडे, दर्शना वाव्हळ, हेमलता जोशी, छाया शिंदे, चारुलता मदन, पल्लवी भोर, श्रद्धा धुरी, मानसी आमडेकर, डॉ. वृषाली देशमुख इत्यादिंच्या यशस्वी कामगिरीतून 'महिला आणि गिर्यारोहणा'चे संमेलन यशस्वीपणे पार पडले.

धन्यवाद

| | | |
|---|---|---|
| विनोद सौदागर | रवींद्र द. लाड. | अरुण भंडारे |
| कार्यवाह | संमेलन समन्वयक | अध्यक्ष |

## 'प्रेरणा पुरस्कार' व 'सॅल्यूट इंडिया'



सॅल्यूट इंडिया उपक्रमाचे , अभियानाचे हे दुसरे वर्ष, भारतीय सैन्य दलातील अधिकारी जवान यांच्या व्यथा , भारतीय जनतेकडून असणाऱ्या त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्याचे उद्दिष्ट समोर ठेऊन सॅल्यूट इंडिया अभियानाची निर्मिती झाली. आपल्या सैन्यदलातील निवृत्त जवान आणि अधिकारी यांचा प्रेरणा पुरस्कार देऊन आपण गौरव करण्याचे ठरवलेले आहेच. त्यानुसार पहिला पुरस्कार गतवर्षी दिला गेला.

सॅल्यूट इंडियाच्या समविचारी कार्यकर्त्यांच्या विचारमंथनातून आपल्या संरक्षण दलाची ओळख प्रदर्शनाद्वारे मुलुंड मधील विद्यार्थी, पालक, सभासद यांना करून देण्याचे ठरले.

त्यानुसार भारतीय नौदलाच्या सामर्थ्याचे दर्शन (India's Naval Prowess) घडविणारे एक प्रदर्शन शुक्रवार दि. ३० सप्टेंबर, शनिवार १ ऑक्टोबर आणि रविवार २ ऑक्टोबर, २०१६ रोजी आयोजित केले होते. उद्घाटन समारंभाला भारतीय नौदलाचे रिअर ॲडमिरल सतीश घोरमाडे, वेस्टर्न नेव्हल कमांड यांनी केले. भारतीय नौदलातील युद्ध नौका , विनाशिका , पाणबुड्या , विमानवाहू नौका यांच्या प्रतिकृती प्रदर्शनात होत्या . नौदलातील अधिकारी , जवान प्रदर्शनात उपस्थितांना माहिती देत होते. शेवटच्या दिवशी नौदलाच्या बँडने सर्व उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली . नौदलाच्या काही चित्रफीती या प्रदर्शनात दाखविण्यात आल्या. प्रदर्शनाला मुलुंड व मुलुंडबाहेरील शाळांच्या विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

४ फेब्रुवारी २०१७ रोजी दुसऱ्या प्रेरणा पुरस्काराचा सोहळा पार पडला . या वर्षीच्या पुरस्काराचे मानकरी होते कमांडर श्रीरंग बिजूर , ले. कर्नल सुरेश पाटील, निवृत्त अतिरिक्त उपायुक्त शिरिष इनामदार आणि विंग कमांडर जान्हवी खानोलकर . प्रमुख पाहुणे म्हणून लार्सन अँड टूब्रोचे यशवंत देवस्थळी उपस्थित होते . ज्येष्ठ पत्रकार समीर कर्वे यांनी पुरस्कारप्राप्त मान्यवरांशी संवाद साधला. कमांडर श्रीरंग बिजूर काही कारणास्तव येऊ शकले नाही त्यांनी संदेश पाठवला होता. तो वाचून दाखवण्यात आला. २० मे २०१७रोजी




Ahval text17.indd 19 2/2/2019 4:44:45 PM

'माओवादी - नक्षलवादी क्रांती कुणासाठी ?' या विषयी निवृत्त अतिरिक्त उपायुक्त शिरीष इनामदार यांनी नक्षलवादाने भारतातील अनेक राज्यांसमोर उभ्या केलेल्या आव्हानाचे ,नक्षलवादी चळवळीच्या अंतरंगाचे विश्लेषण आकडेवारीसह श्रोत्यांसमोर मांडले. त्यांच्या परखड विचारांनी श्रोते प्रभावित झाले होते. मैत्रेयीच्या महिला कार्यकर्त्यांनी 'सॅल्यूट इंडिया'च्या सर्वच कार्यक्रमांत बहुमोल मदत केली.

अ. मो. भंडारे — स. श्री. पाटणकर

## अर्थ विभाग



अजित ग. करंदीकर (अध्यक्ष), अ. पं. गोळे (कार्यवाह)

सदस्य - उ.कृ. हंबर्डे, अमिता ठोसर, प्रकाश सडेकर ,विजय वा.वझे, वि.स. जोशी

महाराष्ट्र सेवा संघाच्या अर्थविभागातर्फे अर्थ , कायदा व व्यवस्थापन या विषयांवर दि. १.४.१६ ते दि. ३१.३.१७ या काळात खालील कार्यक्रम सादर झाले.

१. रविवार दि. १९.६.१६ रोजी ''करविषयक नियम, गुंतवणुकीच्या सवलती '' आणि ''आयकर विवरणपत्र भरण्याच्या अटी '' या विषयावर सी.ए. संजीव गोखले यांच्या भाषणाचा कार्यक्रम झाला. गोखले यांनी वैयक्तिक आयकर , विवरणपत्र भरणे तसेच करविषयक सवलती याविषयी उत्तम मार्गदर्शन केले.
२. दि. ११.९.१६ रोजी ''गाय , विज्ञान आणि अर्थकारण '' या विषयी श्री महेश्वरी यांनी गाय हा पूजनीय प्राणी आहे. तसेच गायीचे विज्ञानातील महत्त्व तसेच गायीविषयी अर्थकारण या विषयी विचार मांडले.
३. दि. २३.१०.१६ रोजी डॉ. अभिजित फडणीस यांनी ''उतरत्या व्याजदर काळातील गुंतवणूक '' या विषयी सुंदर मार्गदर्शन केले. काही जेष्ठ नागरिकांना पेन्शन मिळत नाही, वाढती महागाई, व्याजदर कमी होत आहेत , या परिस्थितीत अधिकाधिक उत्पन्न कसे मिळविता येईल या विषयी अतिशय छान मार्गदर्शन केले.
४. दि. २७.११.१६ रोजी विजेचे नियोजन व अर्थकारण या विषयी उल्हास हंबर्डे यांनी विजेचे वहन, वितरण,पारेषण या विषयी उत्तम माहिती दिली. कार्यक्रम अतिशय उद्बोधक झाला.
५. दि. १७.११ १६ रोजी डोंबिवलीस्थित युवकांनी 'ई वॉलेट' ची माहिती दिली. नोटाबंदीनंतर पैशाचे व्यवहार कसे करावेत या विषयी मार्गदर्शन केले.
६. दि २२.१.१७ रोजी डॉ. सुनीती नागपूरकर यांचा 'नोटाबंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम' या विषयावर भाषण झाले. भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या रु. ५०० व रु १००० च्या नोटाबंदीच्या निर्णयाचा आपल्या देशाच्या अर्थकारणावर काय परिणाम होऊ शकतील या विषयी आपले विचार मांडले.
७. दि. ५.३.१७ रोजी उद्योजक सन्मान सोहळा खूपच दिमाखदार झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री शंतनू भडकमकर हे होते व सन्मानमूर्ती होते केतन मुसळे, देवयानी मुसळे, सुधीर हणमंते, आनंद आपटे . सर्वांनी आपआपल्या व्यवसाया विषयी अनुभव सांगितले. सन्मानमूर्तींची मुलाखत श्रेयसी वझे - मंत्रवादी व विजय वझे यांनी घेतली

अवधूत गोळे (कार्यवाह) — अजित करंदीकर(अध्यक्ष)



Ahval text17.indd 20 2/2/2019 4:44:46 PM

# साहित्य सम्राट न.चिं. केळकर ग्रंथालय

अध्यक्ष : नंदिनी हंबर्डे, कार्यवाह : सुषमा पाटणकर, सहकार्यवाह : अ. म. भंडारे
सभासद : द. व. कुलकर्णी, र. द. लाड, स. म. पोतदार, वि. म. सौदागर, सुनीता देवधर, सुहास कराडकर, मेधा देव, रश्मी अनगळ
स्थापना : १ मे १९७९, भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर पुरस्कारप्राप्त 'अ' वर्ग ग्रंथालय

सध्या पुस्तकप्रेमींमध्ये महाबळेश्वर जवळील भिलार या गावी साकारत असलेल्या पुस्तकांच्या गावाबद्दल खूप कुतुहल आहे. निसर्गरम्य वातावरणात कधी झोपाळ्यावर, तर कधी वृक्षांच्या सावलीत बसून वाचन करण्याचा आनंद काही वेगळाच! मात्र या निमित्ताने पुस्तके आपल्याला नेमकं काय देतात यापेक्षा त्यांचे अस्तित्व अधिक जाणवले.विषय कोणताही असो, मनातल्या भावभावना, विचार, विस्तारणारं विश्व खुलं करण्याच्या किल्ल्या पुस्तकात विखुरलेल्या असतात. म्हणूनच पुस्तकांनी समृद्ध ग्रंथालय ही पण एक अभिमानाची व कौतुकाची गोष्ट आहे. आमच्या या ग्रंथालयाचा वर्ष २०१६-१७ चा अहवाल सादर करताना कार्यकारी मंडळाला विशेष आनंद होत आहे. १ मे २०१७ रोजी ग्रंथालयाला ३८ वर्षे पूर्ण होत असून, ग्रंथालयात अनेक दुर्मीळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ उपलब्ध आहेतच, परंतु ते पूर्णपणे संगणकीकृत असे सुसज्ज ग्रंथालय आहे. वर्षभरात ग्रंथालयाने सादर केलेले विविध विषयांवरील कार्यक्रम :

- दि. २३.०४.२०१६ - 'जागतिक वाचक दिन' या निमित्ताने विशेष वाचक संवाद आयोजित करण्यात आला.त्यामध्ये 'वाचणाऱ्याची रोजनिशी' या श्री सतीश काळसेकर लिखित पुस्तकावर रश्मी अनगळ यांनी आपले विचार मांडले.
- दि.६.५.२०१६ ते ९.५.२०१६ - वसंत व्याख्यानमाला : न. चिं. केळकर ग्रंथालय, ग. का. खांडेकर ग्रंथालय आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय या तिन्ही ग्रंथालयांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांतर्गत - १)स्मार्ट सिटी - सुलक्षणा महाजन, २) पर्यावरणाची अक्षयता - डॉ. शरद काळे, ३) अनुभव कथन - डॉ. रवीकिरण भिडे, डॉ. सुबोध खरे व रवींद्र गांगल, ४) व्यंगचित्रकला आस्वाद आणि अनुभव - मधुकर धर्मापुरीकर यांची दर्जेदार भाषणे झाली व त्याला श्रोत्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.
- दि. २५.७.२०१६ -'अनुभव कथन' (जपान सांस्कृतिक देवाण-घेवाण) - जाई कुलकर्णी, श्वेता क्षीरसागर, ईशानी देवरुखकर व माधुरी पाटणकरया चौघींनी आपल्या १४ दिवसांच्या जपान भेटीचे अनुभव व तेथील संस्कृतीची विविध छायाचित्रे स्लाईड शो द्वारे प्रेक्षकांना दाखविली. प्रेक्षकांनीही विविध प्रश्न विचारून आपल्या मनातील औत्सुक्य व्यक्त केले.
- दि.३०.०९.२०१६ - कार्यशाळा २०१६ -राजा राममोहन रॉय ग्रंथालय, कोलकाताद्वारे आणि ग्रंथालय संचलनालय, महाराष्ट्र व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर, मुलुंड यांच्या संयुक्त विद्यमाने राजा राममोहन रॉय प्रतिष्ठानच्या कार्यान्वित अर्थसाहाय्याच्या विविध योजनांची माहितीसंबंधीची कार्यशाळा भरविण्यात आली. या कार्यशाळेचे उद्‌घाटन मा. डॉ. गणेश मुळे , माहिती उपसंचालक कोकण भवन , यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद मा. सु.ही. राठोड, गंथालय उपसंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी भूषविले. श्री. प्रशांत भामरे, अनंत वाघ, किसन पावडे, चंद्रशेखर वझे, राजेंद्र वैती इ. अनेक मान्यवर, न.चिं. केळकर ग्रंथालयाचे पदाधिकारी, ग्रंथपाल व इतर सर्व सदस्य तसेच सुमारे २५ ते ३० अन्य ग्रंथालयांचे पदाधिकारी, ग्रंथपाल या कार्यशाळेस उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा अतिशय सुंदर रीतीने पार पडली.
- १८.१०.२०१६ - 'सेतु माधवराव पगडी स्मृती व्याख्यान (वर्ष पाचवे )- 'कातळशिल्पे' वक्ते - रवींद्र लाड, कोकण इतिहास परिषदेचे विद्यमान अध्यक्ष. या आगळ्या-वेगळ्या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण व्याख्यान देऊन शिल्प आणि कातळशिल्प यातील फरक त्यांनी सोप्या भाषेत चित्रफीतीच्या साहाय्याने उलगडून दाखविला.
- २४.१०.२०१६ - 'मंटो जिंदा है।' मंटो यांच्या साहित्याच्या गाढ्या अभ्यासक डॉ. वसुधा सहस्त्रबुद्धे यांनी आपल्या भाषणातून व त्यांचे सहकारी अक्षय, धनश्री, आणि विशाला यांनी मंटो यांच्या कथांचे अभिवाचन करून मंटो साहित्य अक्षरश: जिवंत केले. या कार्यक्रमाचा खास उल्लेख म्हणजे ग्रंथालयातर्फे २००७ सालापासून 'वाचक संवाद' हा उपक्रम दर सोमवारी सा. ६ ते ७ या वेळात सुरू असून, हा त्याचा ४०० वा भाग होता. अशा स्वरूपाचा उपक्रम सतत १० वर्षे चालविणे ही ग्रंथालयासाठी विशेष अभिमानाची बाब आहे.
- २३.११.२१०६ - 'गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार - वासंती गाडगीळ यांनी पुरस्कृत केलेला हा स्मृती पुरस्कार या वर्षी ज्येष्ठ साहित्यिक श्री. जयंत पवार यांना प्रदान करण्यात आला. पॉप्युलर प्रकाशनातर्फे प्रायोजित या कार्यक्रमाचे स्वरूप असे



Ahval text17.indd 21 2/2/2019 4:44:46 PM

होते. लेखकाचा परिचय - श्री. रामदास भटकळ, मानपत्र वाचन, लेखकाचा सन्मान - अध्यक्ष श्री. हरिश्चंद्र थोरात यांच्या हस्ते, व अध्यक्षीय भाषण, लेखक श्री. जयंत पवार यांचे मनोगत व शेवटी 'लेखकाचा मृत्यु' या त्यांच्या कथेचे अभिवाचन श्री अतुल पेठे यांनी केले.

- २४.१.२०१७ ते २६.१.२०१७ - 'प्रिय रसिक' (वर्ष ७वे) पॉप्युलर प्रकाशन व न. चिं. केळकर ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रम. **पुष्प १ले** - ' क कवितेचा' काव्य परंपरेची झलक दाखविणाऱ्या या कार्यक्रमात किशोर कदम, प्रफुल्ल शिलेदार, श्रीधर नांदेडकर व अनुपमा उजगरे यांचा सहभाग होता. **पुष्प२रे** - नव्या पिढीची लेखिका मनस्विनी लता रवींद्र यांची मुलाखत पत्रकार श्री. मुकुंद कुळे यांनी घेतली. पुष्प ३रे - 'आणि मग एक दिवस'- सुप्रसिद्ध नट नसिरउद्दीन शाह यांच्या आत्मकथनावर आधारित या कार्यक्रमात स्वतः श्री. नसिरूद्दीन शाह, मूळ इंग्रजी पुस्तकाच्या अनुवादिका सई परांजपे व मुलाखतकार शफाअत खान यांचा सहभाग होता. तिन्ही कार्यक्रम अतिशय दर्जेदार झाले व त्यांना प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसादही दिला.
- १९.२.२०१७ - 'साहित्य साधना पुरस्कार'(२०१६-१७) , वर्ष १२ वे. - न. चिं. केळकर ग्रंथालयाचा मानाचा पुरस्कार! या वर्षी हा पुरस्कार,'टेक्नॉलॉजी ऑल्वेज विन्स' या श्री. द. व. कुलकर्णी लिखित कथासंग्रहाला अध्यक्ष श्री. शिरीष गोपाळ देशपांडे यांच्या हस्ते देण्यात आला. या वेळी सौ. कुलकर्णी यांनी या पुस्तकातीलच एका कथेचे वाचन केले. आणि लेखकाने आपले मनोगत व्यक्त केले, कार्यक्रम अतिशय सुंदर झाला.
- २३.१.२०१७ - 'राम गणेश गडकरी-एक स्मरण' हा कार्यक्रम ग. का. खांडेकर ग्रंथालय, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुलुंड शाखा व न. चिं केळकर ग्रंथालय या तिनही ग्रंथालयांच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात आला. राम गणेश गडकरी यांच्या साहित्यावर (काव्य, नाट्य, विनोद, इ.) आधारित अशा बहुरंगी कार्यक्रमाची सांगता त्यांच्या नाट्यगीते गाऊन झाली. स्थानिक कलावंतांचा सहभाग असलेल्या या कार्यक्रमाला श्रोत्यांनी भरभरून दाद दिली.
- ग्रंथालयाचा असाही एक उपक्रम - 'ग्रंथालय तुमच्या दारी'- या योजनेअंतर्गत गतवर्षीपासून मुलुंडमधील 'सिटी ऑफ जॉय' या गृहसंकुलामध्ये ग्रंथालयातर्फे दर बुधवारी सा. ६ ते ७ या वेळात पुस्तकांची देवाण-घेवाण करण्यात येते. वर्षभरात एकूण ३५ सभासद या योजनेचा लाभ घेत असून यावर्षी त्यांना दिवाळी अंक व मासिकेही उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच मुलांसाठी बालविभाग सुरू करण्यात आला असून ३ छोटे दोस्त त्याचा आनंद घेत आहेत. या उपक्रमासाठी ग्रंथालयाचे कार्यकारी मंडळ व कर्मचारी खूप मेहनत घेत असतात ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.

महाराष्ट्र सेवा संघाच्या विश्वस्त, कार्यकारी मंडळ, सभासद आणि ग्रंथालयाच्या वाचकांकडून व कर्मचाऱ्यांकडून मिळालेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

सुषमा पाटणकर — नंदिनी हंबर्डे
कार्यवाह — अध्यक्ष

## ज्ञानेश्वर पुस्तक पेढी अहवाल-२०१६/२०१७

सन २०१६/१७ मध्ये इयत्ता १०वीच्या एकूण १३ विद्यार्थ्यांनी पुस्तके नेली.त्यातले ६ विद्यार्थी नवीन व ७विद्यार्थी जुने, तसेच ९ वी तील ८ विद्यार्थी अशी एकूण २१ विद्यार्थ्यांनी पुस्तके नेली. या विद्यार्थ्यांना मागील पुस्तके पुरेशी असल्यामुळे पुस्तकांची खरेदी करण्यात आली नाही.

प्रदीप वाईकर, उमेश काणेकर ,सेवक — जान्हवी राणे, ग्रंथपाल



Ahval text17.indd 22 2/2/2019 4:44:46 PM

## साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी | वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ | एकूण |
|---|---|---|
| २६३ | १११ | ३७४ |

३१-३-२०१७ रोजी उपलब्ध ग्रंथ - ३५,२२२

अहवाल वर्षात ५५,१४१/- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

### ग्रंथालय सभासद तपशील

### ३१-३-२०१७ अखेर सभासद

| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | ग्रंथ विभाग-सिटी ऑफ जॉय |
|---|---|---|---|
| २०२ | ५२ | ५०० | ३ |
| अंक विभाग | सन्माननीय सदस्य | सिटी ऑफ जॉय | एकूण सदस्य |
| १६५ | २ | २९ | ९५३ |

### ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील

| प्रकार | मासिके | त्रैमासिके | पाक्षिके | साप्ताहिके | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ४६ | ७ | १ | ११ | ६५ |
| हिंदी | ८ | - | २ | - | १० |
| इंग्रजी | १९ | - | १५ | ३ | ३७ |
| एकूण | ७३ | ७ | १८ | १४ | ११२ |

### दिवाळी अंक योजना २०१६-२०१७

| | |
|---|---|
| सभासद संख्या | १७४ |
| अंकाचे प्रकार | ८२ |
| अंकांच्या एकूण प्रती | २५४ |
| खरेदी किंमत रुपये | ३२,४०२/- |

सहस्रचंद्रदर्शन

### मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | १२ | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवशक्ती, नवाकाळ, सकाळ, लोकमत, रत्नागिरी टाईम्स, तरुण भारत, प्रहार, पुढारी, सामना, नवराष्ट्र |
| हिंदी | २ | नवभारत टाईम्स, नवभारत |
| इंग्रजी | ७ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, फ्री प्रेस जर्नल, इकॉनॉमिक टाईम्स, एशियन एज, हिंदुस्थान टाईम्स, डी.एन्. ए. |
| गुजराथी | २ | मुंबई समाचार, गुजराथी समाचार |

### सायंदैनिके

| प्रकार | संख्या | नाव |
|---|---|---|
| मराठी | २ | महानगर, संध्यानंद |
| हिंदी | १ | सामना |
| इंग्रजी | २ | आफ्टरनून, मिड-डे |



Ahval text17.indd 23 2/2/2019 4:44:46 PM

# दृष्टिसेवा अभ्यासिका

अध्यक्ष - सुनीता देवधर, कार्यवाह - रश्मी अनगळ, कोषाध्यक्ष - नंदिनी हंबर्डे

सभासद - प्रियांका मोकाशी, विनोद सौदागर, श्री. सदाशिव पोतदार, श्री. द.व. कुलकर्णी

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड व 'नॅब इंडिया' दोन संस्थांमध्ये १५ जून २०१६ रोजी दृष्टिसेवा केंद्राविषयी नवीन करार करण्यात आला. हा करार १७ जून २०१६ पासून अंमलात येऊन तीन वर्षे कार्यान्वित राहून त्यानंतर आवश्यकतेनुसार त्याचे नूतनीकरण करण्याचे निश्चित करण्यात आले.

१५ जून २०१६ रोजी विद्यार्थ्यांना दृष्टिसेवा अभ्यासिकेत प्रवेश देण्यात आला व शुक्रवार, दि.१७ जून २०१६ पासून २०१६-१७ च्या अभ्यासवर्गाचा आरंभ झाला. विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी पश्चिम उपनगरात राहाणाऱ्या विद्यार्थ्यांना विलेपार्ले येथे सुरू करण्यात आलेल्या केंद्रात पाठविण्यात आले. इंग्रजी माध्यमात ४ व मराठी व हिंदी माध्यमात प्रत्येकी सहा सहा अशा १६ विद्यार्थ्यांना मुलुंडच्या आपल्या अभ्यासिकेत प्रवेश देण्यात आला. 'नॅब' ने नियुक्त केलेले ३ व दृष्टिसेवेत रुजू झालेल्या २० ते २२ शिक्षकांनी अध्यापनाची जबाबदारी घेतली. विद्यार्थ्यांच्या स्वाध्याय वह्या लिहीणे तसेच सराव परीक्षेसाठी त्यांचे पेपर्स लिहिण्याची जबाबदारी लेखनिकांनी स्वेच्छेने पार पाडली. मुलुंडमधील परीक्षा केंद्रे, मुलुंड विद्या मंदीर व लोकमान्य टिळक इंग्लिश हायस्कूल, या शाळांनी सराव परीक्षा तसेच शालान्त परिक्षेत दृष्टिबाधित विद्यार्थ्यांसाठी लेखनिक देऊन मोलाची मदत केली.

मार्च २०१६ मध्ये दृष्टिसेवेतर्फे शालान्त परीक्षेला बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १००टक्के निकाल लागला. यशस्वी विद्यार्थ्यांसाठी २२ जून २०१६ रोजी 'गुणगौरव सोहळा' डॉ. सौ. मेघना म्हसकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

नवीन शैक्षणिक वर्षात दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची सहल येऊर येथील 'गोल्डन स्वान रिसॉर्ट' मध्ये नेण्यात आली होती. प्रथम सत्राच्या शेवटी, विद्यार्थ्यांसाठी 'दिवाळी पार्टी' चे आयोजन करण्यात आले. दुसऱ्या सत्रात विद्यार्थ्यांना शैक्षणिक भेटीसाठी, 'नेहरू रोड पोस्ट ऑफिस' व 'ठाणे जनता सहकारी बँक', मुलुंड येथे नेऊन पोस्ट ऑफिस व बँकेच्या कामकाजाविषयी माहिती देण्यात आली. शालान्त परीक्षेच्या शेवटच्या दिवशी २४ जून २०१७ रोजी विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन केले.

या वर्षातील महत्त्वाची घटना म्हणजे अंधेरीच्या 'स्नेहांकित' या संस्थेबरोबर एक वर्षाचा करार करून 'दृष्टिसेवा संगणक केंद्र' सुरू करण्यात आले. या संगणक केंद्रात ६वी ते १२वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या दृष्टिबाधित विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. हे केंद्र २८ ऑगस्ट २०१६ ते २६ मार्च २०१७ या कालावधीत प्रत्येक रविवारी कार्यरत होते. 'स्नेहांकित' ने पुरस्कृत केलेल्या शिक्षकांकडून विद्यार्थ्यांना संगणक व संभाषणात्मक इंग्रजी शिकविण्यात आले. दिवाळीच्या सुट्टीत विद्यार्थ्यांना शहापूर येथे एक आठवड्याच्या कँपसाठी नेण्यात आले.

२६ मार्च २०१७ रोजी संगणक केंद्राच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. निरोप समारंभात विद्यार्थ्यांनी इंग्रजी संभाषणाचे प्रात्यक्षिक दाखवून उपस्थितांची वाहवा मिळविली.

रश्मी अनगळ , कार्यवाह — सुनीता देवधर, अध्यक्ष

**अभिप्राय :**

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंडच्या ग्रंथालयास भेटण्याचा सुयोग आला. सर्वार्थाने संपन्न अशा या ज्ञाननिधीस उदंड शुभेच्छा!

...डॉ. तारा भवाळकर.(१५.०१.२०१७)

तुमचा वाचकवर्ग भरभरून वाढू दे!

...सई परांजपे. (२६.०१.२०१७)



Ahval text17.indd 24 2/2/2019 4:44:46 PM



विज्ञान

## विज्ञान विभाग (विज्ञान प्रेमींचा मंच)

अध्यक्ष - सतीश पाटणकर , कार्यवाह - नितीन देशपांडे
कार्यकारी सदस्य - अरुण भंडारे, सीमा केतकर, प्रकाश सडेकर
**विशेष सहभागी तरुण कार्यकर्ते -**
सचिन वझे, शील फडके, जाई कुलकर्णी, चिन्मय कमळे, चिन्मयी वझे, अनिरुद्ध शेवळे, आदित पाटणकर, आदित्य भाभे, तुषार भाबल, अक्षय झेंडे

गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही विज्ञान विभागाने कार्यशाळा, व्याख्याने, राष्ट्रीय विज्ञान दिन स्पर्धा,अशा वेगवेगळ्या कार्यक्रमांतून विज्ञान प्रसार आणि प्रबोधनाचा प्रयत्न यशस्वीपणे सुरू ठेवला. ह्यापुढे अशा प्रकारचे कार्यक्रम ऐरोली शाखेतही करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू करण्यात आले आहेत.

रोबोटिक्स कार्यशाळा - ७ मे २०१६ : या वर्षाची सुरुवात ७ मेला पहिल्या स्तरावरच्या रोबोटिक्सच्या कार्यशाळेने झाली. ८ वी ते ११ वी मधल्या शालेय विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र सेवा संघाच्या कार्यकर्त्यांनी पुरविलेल्या साधनसामुग्रीतून स्वतःच रोबो बनविले. विद्यार्थ्यांनी रोबो बनविण्याच्या प्रक्रियेतील सोल्डरिंग, पार्ट जोडणे, वगैरे सर्व आनंदाने केले. त्यांनी उत्सुकता शिगेला पोहोचली जेव्हा हे रोबोज त्यांच्या आज्ञेनुसार काम करू लागले.

रोबोटिक्स कार्यशाळा -१२ जून २०१६ :या कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांना - व्यक्तींना, केबलविरहित रोबो, जे रिमोटवर काम करतात, ते शिकविण्यात आले. सहभागी व्यक्तींच्या कौशल्याची क्षमता आजमावून पाहाण्यासाठी एक वेगळा इंग्रजी 'ए' आकाराचा ट्रॅक बनविण्यात आला होता, ज्यावर स्पीडब्रेकर्स होते, रम्ब्लर स्ट्रिप्स होत्या. सहभागी विद्यार्थी, व्यक्तींनी हे अडथळे कमीतकमी वेळात, यशस्वीपणे पार करणे अपेक्षित होते.

व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा - जुलै २०१६ : 'महाराष्ट्र टाइम्स'च्या सहकार्याने वैद्यकीय व अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांसाठी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत इच्छुक विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेचे निकष, नियम इ. बाबत इस्तंभूत माहिती देण्यात आली. या सत्राला विद्यार्थी आणि पालक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. वैद्यकीय व अभियांत्रिकीच्या शाखेत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांनी व्याख्यात्यांना प्रश्न विचारले.

व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा - जुलै २०१६ : या दुसऱ्या कार्यशाळेचे नेतृत्व केले होते 'टाटा इंस्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' शी संलग्न असलेल्या डॉ. हेमचंद्र प्रधान यांनी. आपल्या अमोघ वक्तृत्वाने त्यांनी पदवी, कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील अनेक पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या संधीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. मेडिकल रेप्रेझेंटेटिव्ह, भारतीय सैन्यदले, रिसर्च सायंटिस्ट, आ.ए.एस., आय.पी.एस. अशा अनेक पर्यायांची महत्त्वपूर्ण माहिती ते देत असताना भविष्यातले पदवीधर त्यांचा शब्द न् शब्द टिपून घेत होते.

कॅशलेस व्यवहार -२३ डिसेंबर, २०१६ : रोकडविरहित व्यवहार - रु.५०० व १००० च्या नोटा चलनातून बाद केल्यानंतर उद्भवलेल्या अभूतपूर्व नोटा टंचाईवर रोकड विरहित व्यवहार करून कशी मात करायची हे जनसामान्यांना समजावून सांगण्यासाठी अर्थ आणि विज्ञान विभागाने एक कार्यशाळेचे आयोजन केले होते. इंटरनेटच्या माध्यमातून मोबाईल फोन किंवा संगणकाचा वापर करून रोकड विरहित व्यवहार कसे करावे याचे मार्गदर्शन श्री. फाटक आणि श्री. गुळवणी यांनी अतिशय तपशीलवारपणे केले. यावर श्रोत्यांनी अनेक प्रश्न विचारले. त्यातील महत्त्वाचा प्रश्न होता,'अशा व्यवहारात आपल्या खात्यातून इतर कुणी पैसे काढू नयेत याकरिता काय सावधगिरी बाळगायची ?'यावर वक्त्यांचे उत्तर होते, असुरक्षित नेटवर्कचा वापर टाळा.

राष्ट्रीय विज्ञान दिन (२४ व २६ फेब्रुवारी २०१७) : राष्ट्रीय विज्ञान दिन २४ व २६ फेब्रुवारीला विज्ञान विभागाने साजरा केला. २४ तारखेला ७वी आणि ८वी च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमावर आधारित काही विज्ञान प्रयोग करायला सांगितले होते, यामध्ये आपल्या शिक्षकांची मदत घ्यायला त्यांना परवानगी दिली होती. विविध शाळांमधील १९ संघांनी स्पर्धेत भाग घेतला होता. एका शाळेच्या विद्यार्थ्यांनी, त्यांचे शिक्षक त्यांच्यासोबत आले नसतानादेखील स्पर्धेतील दुसरे बक्षीस पटकावले.

२६ फेब्रुवारीला 'सायन्स क्विझ'चे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा चांदिवली आणि भांडुपच्या 'पवार पब्लिक स्कूल'च्या विद्यार्थ्यांनी अगदी लीलया जिंकली.

स्पर्धेच्या आयोजनात संस्थेच्या मैत्रेयी माहिला विभागाच्या कार्यकर्त्यांनी मोलाची मदत केली, त्याचा उल्लेख येथे आवर्जून करायला



Ahval text17.indd 25 2/2/2019 4:44:46 PM

हवा. त्यांच्या सहकार्यामुळेच ही स्पर्धा वेगळे यश संपादून गेली. स्पर्धेच्या दरम्यान सहभागी मुलांना अल्पोपाहार देण्यात आला. स्पर्धेतल्या सहभागी शाळांनी पुढील वर्षीही या उपक्रमात सहभागी होण्याचा आपला मनोदय व्यक्त केला.शाळांनी व्यक्त केलेल्या त्यांच्या या विचारांनी विज्ञान विभागाला असे अनेकविध कार्यक्रम करायला एक वेगळेच बळ मिळेल.

नितीन देशपांडे , कार्यवाह सतीश पाटणकर, अध्यक्ष

## ऐरोली शाखा


डॉ. आनंद रा. कट्टी - अध्यक्ष , श्री. प्रदीप र. सप्रे - उपाध्यक्ष, श्री. शंकर गो. वीरकर - कार्यवाह, श्री. सुधीर वा. बागाईतकर - कोषाध्यक्ष,
**सदस्य :** श्री. चं. ना. वझे (पदसिद्ध), श्री. जयप्रकाश बर्वे (पदसिद्ध) , श्री. कि.म. पेंढरकर, श्री. मु. शं. बालंखे , सौ. संगीता जोशी, सौ. आरती सप्रे, सौ. अंजली पेंढरकर, सौ. दर्शना निमसे, श्री. निनाद जोशी, श्री.अनिल कुऱ्हेकर, सौ. प्रीती देशपांडे

ऐरोली शाखेचा १६ व्या वर्षाचा अहवाल सादर करताना आम्हाला आनंद होत आहे. या वर्षातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे ऐरोली शाखेच्या वास्तूचे नूतनीकरण! वाढती स्पर्धा, लोकांची बदलती आवड, काळाप्रमाणे चालण्याची गरज व इमारतीची स्थिती लक्षात घेता, ऐरोली शाखेच्या इमारतीची दुरूस्ती व नूतनीकरणाच्या विचार गेले वर्षभर चालू होता. परंतु अहवाल वर्षात याबाबतीत व्यवस्थापन समितीने ठोस पावले उचलत नूतनीकरणाचे काम पूर्ण केले. आता ऐरोलीमध्ये संस्थेची नूतनीकरण केलेली, सुंदर वास्तू दिमाखदारपणे उभी आहे. यासाठी सभागृह ४ महिने बंद ठेवण्यात आले होते. परंतु काम पूर्ण झाल्यावर नवं रूप आलेल्या या वास्तूमध्ये, अभिजाततेशी आपली नाळ न तोडता, कार्यक्रमांचे नवे सूर अन् नवे तराणे पुन्हा घुमायला लागले आहेत. .
गेल्या वर्षीच्या कार्यक्रमाची सुरुवात वर्धापन दिनाने झाली. ज्येष्ठ गीतकार जगदीश खेबूडकर यांच्या ५ व्या स्मृती दिनाचे औचित्य साधून त्यांच्या गाण्यांवर आधारित एक कार्यक्रम संस्थेतर्फे आयोजित करण्यात आला होता. 'फॉच्युन एंटरटेनमेंट' च्या कलाकारांनी सादर केलेला हा कार्यक्रम रसिकांची मने जिंकून गेला. प्रतिवर्षीप्रमाणे संस्थेतर्फे विद्यार्थी गुणगौरव व ज्येष्ठ शिक्षक सन्मान सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या अंतर्गत १९ शिक्षकांना व ५२ विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वर्षीची 'दिवाळी पहाट' रंगली ती नाट्यगीते, भक्तीगीते व रागदारीवर आधरित हिंदी चित्रपट गीतांनी. ह्या गाण्यांची आतषबाजी दिवाळीची पहाट सुरेल करून गेली. निश्चलनीकरणानंतर मोठया प्रमाणात आवाहन करण्यात आलेल्या 'डिजीटल इंडिया' या उपक्रमाला प्रतिसाद देत संस्थेतर्फे 'रोकडविरहीत अर्थव्यवहार' या विषयी माहिती देणारा, सी.डी.एस.एल.च्या चंद्रशेखर ठाकूर यांनी सादर केलेला कार्यक्रम संस्थेतर्फे आयोजित करण्यात आला. तो उपस्थितांना अर्थसाक्षर करून गेला.
मैत्री, कला विभाग व ग्रंथालय हे विभाग उत्तम काम करत असून आपल्या वर्षभरातील सुमारे ३० कार्यक्रमांमधून रसिकांना काहीतरी नावीन्यपूर्ण, सकस व वैशिष्टपूर्ण गोष्टी देण्याचे काम करत आहेत. त्यांचे सविस्तर अहवाल स्वतंत्रपणे जोडले आहेत. उच्चशिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी आपल्या अभ्यासिकेचा लाभ घेतात.
परमपूज्य श्री अच्युत महाराज सत्संग मंडळाच्या संयुक्त विद्यमाने 'भागवत् सप्ताह' प्रतिवर्षीप्रमाणे उत्साहात साजरा झाला. तसेच प्रभात चित्र मंडळाच्या साहाय्याने कलात्मक व दर्जेदार चित्रपट दाखवले जातात.
संस्थेच्या मुख्य कार्यकारी मंडळाने वेळोवेळी केलेल्या सहकार्यामुळे ऐरोली शाखेची वाटचाल उत्तम चालू आहे. ऐरोली शाखेची व्यवस्थापक समिति सर्व कर्मचारी, कंत्राटदार तसेच इतर सर्व संबंधितांची आभारी आहे.

धन्यवाद !

शंकर वीरकर (कार्यवाह) डॉ. आनंद कट्टी (अध्यक्ष)

# कला विभाग - ऐरोली शाखा



श्री. किशोर म. पेंढरकर - अध्यक्ष, श्री. प्रदीप श्री. नाटेकर - उपाध्यक्ष
श्री. सुधीर बागाईतकर, श्री. अनंत धर्माळे

वर्ष २०१६-१७ या कालावधीचा कला विभागाचा अहवाल आम्ही सविनय सादर करीत आहोत. अहवाल वर्षात वेगवेगळे सामाजिक विषय आणि आशय हाताळणारे दर्जेदार कार्यक्रम देण्याचा प्रयत्न करण्यास आला.

यावर्षातील कार्यक्रमांची सुरुवात विकास बहल दिग्दर्शित व रॉनी स्क्रूवाला निर्मित ''चिल्लरपार्टी '' या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटाने करण्यात आला. मुलांशी निगडित असा चित्रपट असल्याने संस्कार शिबिराच्या माध्यमातून तो दाखविण्यांत आला व छोट्यांनी त्याचा मनमुराद आनंद घेतला.

सदाशिव अमरापूरकर, अतुल कुलकर्णी, रविंद्र मंकणी, तुषार दळवी, इ. कलाकार असणारा व श्रीमती सुमित्रा भावे व श्री. सुनिल सुकथनकर यांनी दिग्दर्शित केलेला राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट 'वास्तुपुरुष '' दाखविण्यात आला.

फेसबुक किंवा व्हाट्सॲप सारख्या सोशल नेटवर्किंग साईट्सनी एक आभासी जग आपणां सर्वांभोवती निर्माण केले आहे. प्रत्यक्ष जग व हे आभासी जग या दोन्ही जगांचे एकमेकांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे प्रभाव पडत असतात. या सर्वांत आपले स्वतःचे नक्की व्यक्तिमत्व काय व आपली स्वतःची नक्की ओळख काय याबद्दल आपल्याच मनांत संभ्रम निर्माण होतो. या स्थितीवर भाष्य करणारे प्रणव सखदेव लिखित व अभिजित झुंझाररव दिग्दर्शित अभिनय, कल्याण निर्मित '' ID अर्थात I चं Deconstruction'' हे प्रायोगिक नाटक सादर करण्यांत आले. लोकांच्या सद्य मनःस्थितीजवळ जाणाऱ्या या नाटकाचा प्रेक्षकांनी आस्वाद घेतला.

ओम पुरी, स्मिता पाटील, अमरीश पुरी, सदाशिव अमरापूरकर, नसिरुद्दीन शहा व शफी इनामदार असे दिग्गज अभिनेते असलेला गोविंद निहलानी दिग्दर्शित राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट ''अर्धसत्य '' दाखविण्यात आला. या चित्रपटांत भ्रष्ट नेते, त्यांनी पाळलेले गुंड व त्यामुळे पोलिसांची होणारी कुचंबणा अत्यंत प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.

वरील हिंदी चित्रपटाची साधर्म्य साधणारा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपट '' सिंहासन '' दाखविण्यात आला. सुप्रसिध्द लेखक अरुण साधू यांच्या सिंहासन व मुंबई दिनांक या कादंबरीवर आधारित डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित व विजय तेंडूलकर लिखित चित्रपटांत निळू फुले, श्रीराम लागू, मोहन आगाशे व नाना पाटेकर इत्यादी नामवंत कलाकारांच्या भूमिका आहेत.

होमरूल चळवळ व लखनौ कॉंग्रेस परिषदेला १०० वर्ष पूर्ण होण्याच्या निमित्ताने प्रसिध्द अर्थतज्ज्ञ व लेखक श्री. चंद्रशेखर टिळक यांचे लोकमान्य श्री बाळ गंगाधर टिळक यांच्या सहस्त्रपैलू व्यक्तिमत्वाची व त्यांच्या तत्वांच्या मांडणीची ओळख करून देणारे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानांतून लोकमान्यांच्या आंतरराष्ट्रीय जाणिवा देखील किती प्रगल्भ होत्या याचा उलगडा उपस्थित प्रेक्षकांना झाला. Employees Stock Option, Share Listing , केसरीसाठी आयात यंत्रसामृग्री इत्यादी निर्णय त्यांची दूरदृष्टी दर्शवितात. इतर अनेक उदाहरणांव्दारे स्वातंत्र्य चळवळ व सार्वजनिक गणेशोत्सवाव्यतिरिक्त त्यांच्या सहस्त्रपैलू व्यक्तिमत्वाची ओळख श्री. चंद्रशेखर टिळक यांनी त्यांच्या ओघवत्या वक्तृत्वाने करून दिली. प्रेक्षकांनी या कार्यक्रमाला चांगली उपस्थिती लावली होती.

सौ. हंसा वाडकर यांच्या जीवनावर आधरित श्याम बेनेगल दिग्दर्शित हिंदी चित्रपट ''भूमिका'' दाखविण्यात आला. या चित्रपटांत अमोल पालेकर, स्मिता पाटील, अमरिश पुरी यांचा उत्कृष्ट अभिनय प्रेक्षकांना पाहण्यास मिळाला.

न्यूयॉर्क फिल्म फेस्टिवल पुरस्कार प्राप्त चित्रपट ''Highway एक Selfie आरपार '' दाखविण्यात आला. या चित्रपटाचे लेखन गिरीश कुलकर्णी व दिग्दर्शन उमेश विनायक कुलकर्णी यांनी केले आहे. या चित्रपटांस उत्कृष्ट दिग्दर्शन व उत्कृष्ट लेखन हे पुरस्कार देखील प्राप्त झाले. या चित्रपटांत हुमा कुरेशी, टिस्का चोप्रा, गिरीश कुलकर्णी, रेणुका शहाणे, सुनील बर्वे, मुक्ता बर्वे, नागराज मंजुळे, किशोर कदम इ. कलाकरांनी भूमिका साकारल्या. हा चित्रपट देखील प्रेक्षकांना भावला.

दरवर्षीप्रमाणे कोजागिरी पौर्णिमानिमित्ताने सुप्रसिध्द संगीतकार उदय चितळे यांनी स्वरसाज दिलेले व ख्यातनाम गायिका रंजना जोगळेकर व सुप्रसिध्द गायक विनायक जोशी यांनी ''गीत नवे गाइन मी..'' हा सांगीतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमांत समर्थ रामदास, बालकवी, विं. दा. करंदीकर, कुसुमाग्रज, वसंत बापट, बा. भ. बोरकर, ना. धों, महानोर, शांता शेळके, सुरेश भट, प्रविण दवणे इत्यादी कवींच्या कवीता गीतरूपाने सादर करण्यात आल्या. या कार्यक्रमानंतर चंद्राच्या साक्षीने इमारतीच्या

गच्चीवर अल्पोपहार व मसाला दूधाचा आस्वाद उपस्थित रसिक प्रेक्षकांनी घेऊन कोजागिरी पौर्णिमा साजरी केली.

चित्रमहर्षी व्ही. शांताराम यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांनी दिग्दर्शित केलेला व बर्लीन आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांत 'सिल्व्हर बेअर पदका'ने तसेच बेस्ट फिचर फिल्म म्हणून आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरवलेला नितांत सुंदर चित्रपट ''दो आँखे बारह हाथ'' हा चित्रपट दाखविण्यात आला. या चित्रपटांत व्ही. शांताराम व संध्या यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

मागील १० वर्षाप्रमाणे यंदा ११ व्या वर्षीदेखील एकपात्री स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ऐरोली व्यतिरिक्त चेंबूर, वाशी, पनवेल, दादर आणि कल्याण येथील स्पर्धकांनीदेखील सहभाग घेऊन आपली कला सादर केली. अभिनयाचा दर्जा वर्षागणिक उंचावत असल्याचे जाणवले व स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडली.

स्मिता पाटील यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून त्यांच्या अनेक पारितोषिक प्राप्त चित्रपटातील मैलाचा दगड ठरलेला असा ''उंबरठा'' हा चित्रपट दाखविण्यात आला. या चित्रपटाचे दिग्दर्शन जब्बार पटेल यांनी केलेले असून प्रमुख भूमिकेत गिरीष कर्नाड व स्मिता पाटील आहेत.

आतापर्यंत सादर केलेल्या शास्त्रीय व उपशास्त्रीय संगीत मैफलीला मिळालेला प्रतिसाद पाहून नामवंत गायिका प्राजक्ता मराठे यांचा ''शास्त्रीय नाटयसंगीत व अभंग गायनाची संगीत मैफिल'' आयोजित करण्यात आली. प्राजक्ता मराठे यांना तबल्यावर स्वप्निल भिसे व संवादिनीवर सिध्देश डिचोलकर यांनी साथ दिली. संगीत प्रेमी रसिकांनी चांगल्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला.

समांतर चित्रपटांचा नायक अशी ओळख असलेल्या ओमपुरी यांना आदरांजली वाहाण्याच्या निमित्ताने त्यांची अतिशय वैशिष्टपूर्ण भूमिका असलेला ''रोड टू संगम'' हा चित्रपट दाखविण्यात आला. या चित्रपटांत मुस्लिम समाजाची मानसिकता, त्यांच्या देशभक्तीबद्दल घेतली जाणारी शंका याचा वेध घेण्यात आला आहे. त्या निमित्ताने चित्रपटाचे दिग्दर्शक अमित राय यांच्याशी चर्चा करण्याची संधी प्रेक्षकांना मिळाली.

फेब्रुवारी - मार्च जवळ आल्यावर प्रत्येकाला ओढ लागते अर्थसंकल्पाची व त्याचा आपल्या खिशावर होणाऱ्या परिणामांची. या वर्षीतर नोटबंदीच्या निर्णयामुळे आधीच त्रस्त झालेल्या सर्वसामान्य जनांना अर्थसंकल्पात काय वाढून ठेवलं आहे याची अधिकच उत्सुकता निर्माण झाली होती. यानिमित्ताने ''नोटबंदीनंतर अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम व अर्थसंकल्प २०१७'' अतिशय सरळ, सोप्या व सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत उलगडून दाखविण्यासाठी सुप्रसिध्द अर्थतज्ज्ञ सौ. सुनिता नागपूरकर यांचे भाषण ठेवण्यात आले होते. अतिशय सुंदर ओघवत्या व अभ्यासपूर्ण भाषणाव्दारे त्यांनी हे दोन्ही विषय अतिशय सोप्या भाषेत उलगडवून दाखवले. कार्यक्रमानंतर प्रेक्षकांच्या विविध प्रश्नांना त्यांनी अभ्यासपूर्ण उत्तरे देऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले. वेळेची मर्यादा लक्षात घेऊन कार्यक्रम आटोपता घ्यावा लागला.

जागतिक मराठी दिनाच्या निमित्ताने ''लघुपट महोत्सवाचे'' आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात कुसुमाग्रजांच्या कथेवर आधारित ''विश्वनाथ एक शिंपी'', उमेश कुलकर्णी निर्मित ''गिरणी'' व ''थ्री ऑफ अस'' तसचे निलेश कुंजीर या तरूण दिग्दर्शकाचा ''सोनेरी'' असे ४ लघुपट दाखवण्यात आले. हा लघुपटाचा उपक्रम लोकांना अतिशय आवडला व निलेश कुंजीर या तरूण दिग्दर्शकाबरोबर प्रेक्षकांनी चर्चात्मक संवाद साधला.

या वर्षीच्या कार्यक्रमांचा समारोप विजू माने दिग्दर्शित ''खेळ मांडला '' या एका संवेदनाशील चित्रपटाने करण्यात आला. या चित्रपटांत मंगेश देसाई, उदय सबनीस, प्रसाद ओक इ. कलाकारांच्या भूमिका आहेत. अन्यथा देवरे या बालकलाकराच्या उत्कृष्ट अभिनयाने उपस्थित सर्व प्रेक्षकांच्या डोळयात पाणी आले. चित्रपटानंतर सर्वजण काही क्षण स्तब्ध होते व नेहमीची चर्चा सुरू होण्यास काही कालावधी जावा लागला.

प्रभात चित्रमंडळाच्या संयुक्त विद्यमाने सादर करण्यात येणाऱ्या चित्रपटांनंतर होणाऱ्या चर्चेत प्रेक्षक अतिशय उत्साहाने भाग घेतात व चित्रपटात दाखवलेल्या विविध सामाजिक विषयांवर आपली मते मांडून चर्चा करतात. प्रभात चित्रमंडळातर्फे मार्गदर्शक म्हणून संतोष पाठारे, अमित चव्हाण व गणेश मतकरी इ. प्रतिनिधी उपस्थित राहून चर्चेत सहभागी होऊन मार्गदर्शन करतात.

कला विभागाच्या सर्व उपक्रमांना मुख्य कार्यकारी मंडळाचा कायमच पाठिंबा असतो त्याबद्दल कलाविभाग कार्यकारी मंडळाचा आभारी आहे. ऐरोली शाखेची व्यवस्थापन समिती, सर्व कर्मचारी, कंत्राटदार , विविध वृत्तपत्रांचे प्रतिनिधी व रसिक प्रेक्षकांचे कला विभागातर्फे आभार.

श्री. प्रदीप नाटेकर (उपाध्यक्ष)

श्री. किशोर पेंढरकर (अध्यक्ष)



Ahval text17.indd 28 2/2/2019 4:44:47 PM

# मैत्री

१) संगीता जोशी (अध्यक्ष), २) दर्शना निमसे (कार्यवाह), ३) सुनीता देवधर (सल्लागार)
**सदस्य**- प्रीती देशपांडे, छाया देशमुख, आरती सप्रे, मंदा कोंडविलकर,

महाराष्ट्र सेवा संघ,मुलुंड, ऐरोली मैत्री महिला विभाग सन २०१६-१७ या वर्षीचा अहवाल सादर करताना आम्हांला आनंद होत आहे. ऐरोली परिसरातील महिलावर्गासाठी कला, साहित्य संस्कृती, उद्योग - व्यवसाय, आरोग्य, विविध कार्यशाळा, स्पर्धा अशा अनेकविध दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन मैत्रीतर्फे केले जाते.

संस्कार शिबिर - ८ ते १४ वयोगटातील मुलामुलींसाठी प्रतिवर्षीप्रमाणे यावर्षीही दिनांक १३ एप्रिल ते २० एप्रिल २०१६ या कालावधीत संस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकुण १३२ मुलामुलींनी सहभाग घेतला होता. विविध तऱ्हेच्या कलाकृतींचे प्रशिक्षण मुलांना देण्यात आले. त्याचबरोबर रोजचा पौष्टिक खाऊ हे शिबिराचे वैशिष्ट होय.

दि. १३ एप्रिल २०१६- संस्कार भारती रांगोळी प्रशिक्षक मधुरा भोईर यांनी मुलांना ‘संस्कार भारती’त काढली जाणारी चिन्हे व त्या चिन्हांच्या सहाय्याने मोठी रांगोळी कशी काढायची याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

दि. १४ एप्रिल २०१६ - ‘पेपर क्विलिंग’ प्रशिक्षक आशिष यांनी मुलांना वेगवेगळे पानाफुलांचे आकार बनवायला शिकवून फ्रेम कशी तयार करायची याचे प्रशिक्षण दिले.

दि.१५ एप्रिल २०१६– व्यंगचित्र -श्री. बांदल यांनी मुलांना व्यंगचित्र कसे काढावे हे सोप्या पद्धतीने शिकवले.

दि. १७ एप्रिल २०१६ –आगीपासून संरक्षण -फायरब्रिगेड ऑफिस ऐरोली से. ३ येथील अधिकारी, मुलांना आगीपासून बचाव करताना नायड्रोजन सिलेंडरचा वापर कसा करावा. मोठ्या प्रमाणातील आग पाण्याच्या साह्याने कशी विझवली जाते याचे प्रात्यक्षिक संस्थेच्या शेजारी असलेल्या पॅराप्लेजिक शाळेच्या प्रांगणात दाखवले गेले.

१८ एप्रिल २०१६- कापडी पिशव्या शिवायला शिकवले. अतिशय सोप्या पद्धतीने मुलांनी पिशव्या शिवल्या.

१९ एप्रिल २०१६– सिनेमा- ’चिल्लरपार्टी’ -कलाविभाग व प्रभात चित्रमंडळातर्फे मुलांना चिल्लरपार्टी हा सिनेमा दाखविण्यात आला. मुलांनी भरघोस आनंद लुटला.

समारोप

२० एप्रिल २०१६- नेसले पाककृती –विशाखा यांनी नेसलेच्या विविध पाककृती बनविण्यास शिकवल्या मुलांनी शिकता शिकता खाण्याचाही आस्वाद घेतला. शिबिराच्या सामारोपाच्या दिवशी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष मा.श्री चंद्रशेखर वझे उपस्थित होते. त्यांनी मुलांना मोलाचे मार्गदर्शन केले.

दि. ४ जून २०१६- पर्यावरणविषयक समस्या - जनजागृती : प्रमुख वक्त्या - स्वाती टिल्लु, संगीता जोशी,

या कार्यक्रमाद्वारे श्रीमती स्वाती टिल्लु (मुंबई ग्राहक पंचायत, ठाणे विभाग) यांनी ओला कचरा वा सुका कचरा याचे वर्गीकरण कसे करावे याचे चित्रफितीद्वारे मार्गदर्शन केले. प्लास्टिक पिशव्यामुक्त परिसर ठेवण्यासाठी जागृती करण्यात आली.

श्रीमती संगीता जोशी यांनी ओल्या कचऱ्यापासून घरच्या घरी खत कसे तयार करायचे हे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. प्लास्टिक पिशवीवर बहिष्कार टाकून कापडी पिशव्याच वापराव्या यासाठी उपस्थित महिला वर्गाला मैत्रीतर्फे मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.

दि. २१ जून २०१६ - योग– ‘आरोग्याचा मूलमंत्र’ प्रमुख वक्ते डॉ. भूपेन ममानिया, श्रीमती निशा बर्वे. या कार्यक्रमाद्वारे ‘आंतरराष्ट्रीय योगदिना’च्या निमित्ताने मैत्रीतर्फे योगशिबिर घेण्यात आले. २१ ते २४ जून या चार दिवसीय शिबिरात श्रीमती निशा बर्वे आणि डॉ. भूपेन ममानिया यांनी योगाचे महत्त्व पटवून देत माहिती दिली व त्याचबरोबर विविध योगासने शिकवण्यात आली. या कार्यक्रमास प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

दि. २ जुलै २०१६ - कपडयांची निगा कशी राखावी – प्रमुख वक्त्या - श्रीमती कनकलता ठक्कर. ‘डीफर कंपनीचे कलर फिक्सर’ या प्रॉडक्टद्वारे कपडे धुतल्यास रंग कसे जात नाहीत. याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला मैत्रिणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दरम्यानच्या काळात सभागृह वा इमारतीचे नूतनीकरण सुरु होते.



Ahval text17.indd 29 2/2/2019 4:44:47 PM

दि २३ ऑक्टोबर २०१६ - रांगोळी कार्यशाळा - प्रशिक्षक श्रीमती शोभा बांगर – या कार्यशाळेत संस्कार भारती रांगोळी, फुलांची रांगोळी, पाण्यावरची रांगोळी, काडी, झाकण किंवा बोटांच्या साहाय्याने काढली जाणारी रांगोळी. अशा विविध रांगोळ्यांचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले. बहुसंख्येने महिलांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला.

दि. १२,१३,१४ नोव्हेंबर २०१६ : भव्य ग्राहक मेळावा : महिला उद्योजकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने मैत्री तर्फे दरवर्षी ग्राहक मेळाव्याचे आयोजन केले जाते. यावर्षीही ४२ महिला उद्योजक सहभागी झाल्या होत्या. पल्लवी फौजदार यांच्या शुभहस्ते ग्राहक मेळाव्याचे उद्घाटन झाले. त्यांनी महिला उद्योजकांना मार्गदर्शन केले.

दि. १० डिसेंबर २०१६ - मैत्री १२ वा वर्धापन दिन (तपपूर्ती) सोहळा - दीपप्रज्ज्वलन, ईशस्तवनाने कार्यक्रमाची पहिल्या सत्राची सुरुवात आणि ‘सूरमयी संध्या’ - संगीतमय कार्यक्रम. सदर कार्यक्रमात श्रीमती साक्षी पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अनेक दर्जेदार गाणी सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. कॉफीपानानंतर दुसऱ्या सत्रास प्रारंभ झाला. या सत्रात कलर्स मराठी चॅनलवरील मराठी मालिका ‘सरस्वती’ मधिल नायिका सरस्वती उर्फ तितीक्षा तावडे यांची प्रकट मुलाखत श्रीमती दर्शना निमसे यांनी घेतली. आपल्या अभिनयाच्या कारकीर्दीची सुरुवात ते आतापर्यंत त्यांचा प्रवास, अनुभव सांगत असताना त्यांनी मैत्रिणींशी सुसंवाद साधला कार्यक्रमाची सांगता खमंग अल्पोपहाराने झाली.

दि. २१ जानेवारी २०१७ - तीळगूळ समारंभ व पाककला स्पर्धा : मकरसंक्रांत - तीळगूळ समारंभाचे औचित्य साधून पाककला स्पर्धा घेण्यात आली. यात तीळ, बाजरी, गूळ व सुके खोबरे हे पदार्थ वापरून तिखट किंवा गोड पदार्थ बनविणे असे स्वरूप पाककला स्पर्धेचे होते. यात अनेक मैत्रिणींनी सहभागी होऊन तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ बनवून उत्कृष्टरित्या मांडणी करून परीक्षकांची मने जिंकली. स्पर्धेसाठी अंजली बकाणे आणि अनिता ठाकर ह्या परीक्षक म्हणून लाभल्या. उपस्थितांनी खमंग फराळाचा आस्वाद घेताना. उत्कृष्ट तीन पाककृतींना बक्षिसे देण्यात आली. तीळगूळ व वाण देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

दि. ४ फेब्रुवारी २०१७ - ‘सुंदर मी होणार’ मार्गदर्शक - शिल्पा चापडे : आपले व्यक्तिमत्व खुलवण्यासाठी आपण त्वचेची काळजी काशी घ्यावी, बेसिक मेकअप, केशरचना साडी ड्रेपिंग्जचे प्रकार, आपला आहार याविषयी शास्त्रशुद्ध माहिती ब्युटीशियन शिल्पा चापडे यांनी उपस्थित महिलांना दिली. कार्यक्रमास लक्षणीय उपस्थिती होती. पुढे याच विषयावर कार्यशाळा घ्यावी अशी मागणी उपस्थित मैत्रिणींनी केली.

दि. ११ मार्च २०१७ - स्त्री–सन्मान सोहळा आणि कपडे ड्रायक्लिनिंग प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन : दरवर्षी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून समाजात अनोखे कार्य करणाऱ्या महिलेचा गौरव महाराष्ट्र सेवा संघ, ऐरोली ‘मैत्री’ महिला विभागातर्फे केला जातो. यावर्षीही आपल्या संसाराला हातभार लावण्यासाठी मेहनत घेणाऱ्या महिला रिक्षा चालक (ऐरोली) श्रीमती चित्रा शेळके यांचा सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी श्रीमती राधिकाबाई कनिष्ठ महाविद्यालयातील मुख्याध्यापिका श्रीमती शैलजा काळे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले. श्रीमती काळे यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना श्रीमती चित्रा शेळके यांनी आपले कार्य व अनुभव कथन केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात श्रीमती विनीता विचारे यांनी घरच्या घरी ड्रायक्लिनिंग व कपड्यांवरील डाग कसे घालवावे याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. बहुसंख्य महिलांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या वर्षात सादर करण्यात आलेले सर्वच कार्यक्रम दर्जेदार होते व या कार्यक्रमांना मैत्रिणींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेला पाहून आम्हांलाही कार्य करण्यास निश्चितच उत्साह व आनंद होत असतो.

पुढील वर्षातही असेच दर्जेदार कार्यक्रम आयोजित करण्याचा आमचा प्रयत्न असेल.

लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा !

धन्यवाद!

दर्शना निमसे, कार्यवाह — संगीता जोशी, अध्यक्ष



Ahval text17.indd 30 2/2/2019 4:44:47 PM

# सुनीता म. देवधर ग्रंथालय

अध्यक्ष - मुकुंद बालंखे , कार्यवाह - प्रीती देशपांडे
सभासद :- आरती सप्रे, संगीता जोशी, सुनीता देवधर (सल्लागार)

रसिकांना, वाचकांना सप्रेम नमस्कार !

ग्रंथांचे महत्त्व काय सांगावे ? एखादे पुस्तक, त्यातील एखादे प्रकरण, इतकेच कशाला ? त्यातील एखादा उताराही एखाद्याच्या आयुष्याचा सांधा बदलण्यास कारणीभूत ठरतो. ग्रंथाना आत्म्याचे गवाक्ष म्हणतात, ग्रंथाविना घर म्हणजे एकही गवाक्ष नसलेले घर. ग्रंथवाचनाचे प्रामुख्याने तीन हेतू नजरेत भरतात. १) उपयुक्तता २) तात्विकता ३) कलात्मकता.

दिवसेंदिवस समाजमाध्यमांचा विळखा वाढत असूनही आपले ग्रंथालय सभासद संख्या बऱ्यापैकी टिकवून आहे ही अतिशय समाधानाची बाब आहे. सभासद वाढीचा आमचा यावर्षी निश्चितच प्रयत्न राहील.

विविध स्पर्धांचा जो मानस आम्ही व्यक्त केला होता त्यानुसार आमच्या निबंध स्पर्धेला भरघोस यश लाभले. मराठी व इंग्रजी या दोन्ही माध्यमातून ही स्पर्धा घेतली व उपयुक्त पारितोषिके देऊन मुलांचे कौतुक केले. मराठी माध्यमाच्या मुलांचा प्रतिसाद मात्र अत्यल्प होता. एकंदरीत मराठी माध्यमातील अनास्था हि चिंताजनक वाटते. यावर्षी या माध्यमासाठी काहीतरी भरीव करण्याचा विचार आहे.

टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतील प्राध्यापिका विनीता चितळे यांनी त्यांच्या व्यावसायिक समुपदेशनाच्या व्यवसायातील प्रदीर्घ अनुभवाच्या आधारे 'ओ.पी.डी नं. १७' हे अत्यंत वाचनीय पुस्तक लिहिले. या अनुषंगाने या पुस्तकाबद्दलची जिज्ञासा जागृत करण्यासाठी त्यांचा प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम सादर केला. धुवांधार पावसामुळे प्रेक्षक संख्या अतिशय कमी असूनसुद्धा श्री. प्रदीप सप्रे यांनी अत्यंत खुसखुशीत शैलीने त्यांची मुलाखत घेऊन या पुस्तकाविषयी अनौपचारिक गप्पांचा कार्यक्रम रंगतदार केला. दुर्दैवाने त्यानंतर काही महिन्यातच विनीता चितळे यांचे दुखःद निधन झाले. त्या एकेकाळी ग्रंथालयाच्या वाचक प्रतिनिधी होत्या व त्यांचे कायम उपयुक्त मार्गदर्शन असायचे. त्यांच्या आकस्मित निधनाने ग्रंथालयाचा आधार हरपला.

गीता सुळे यांच्या खिडकी या एकपात्री सांगीतिक कार्यक्रमाने बहार आणली. निवृत्तीच्या उंबरठ्यावर असून सुद्धा केवळ मुद्राभीनयाने त्यांनी लाजबाब कार्यक्रम सादर केला. मनस्वी कलाकारांना वय रोखू शकत नाही हेच खरे! यावर्षी संस्थेच्या वास्तूचे नूतनीकरण काम सुरु असल्याने मोजकेच कार्यक्रम पार पाडले. यावर्षी कार्यक्रमांवर रु. ११,२००/– इतका खर्च झाला.

केंद्र सरकारच्या 'ई ग्रंथालय' सॉफ्टवेअरमुळे दैनदिन कामात सुसूत्रता आली, त्याची प्रचिती यावर्षी ग्रंथमोजणीच्या वेळेस आली. केवळ ४ दिवसांतच, दोन वर्षापासून राहिलेली ग्रंथमोजणी यशस्वीरीत्या पूर्ण करून व्यवस्थापनास अहवाल सादर केला.

दिवाळी अंक योजना ही दरवर्षी प्रमाणे भरपूर लोकप्रिय झाली व उत्तम आर्थिक लाभ देऊन गेली. विशेष म्हणजे जर सूचना तक्रार वही वर नजर टाकली तर नवनवीन पुस्तके, दिवाळी अंक, यांच्या सूचनांचा भडीमार असतो, तक्रारींचे प्रमाण अत्यल्प असते. त्यांचे निराकरण त्वरित करण्याचा प्रयत्न असतो. ग्रंथालयासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट म्हणजे शैलजा हांडे या ग्रंथालयाच्या वाचक आहेत त्यांनी रु. १०,०००/– पुस्तक खरेदीसाठी देणगी दिली. त्यानुसार पुस्तकांची खरेदी करून वाचकांना उपलब्ध केली. देणगीदाखल पुस्तके तर बरीच ग्रंथालयात दाखल होतात.

उत्तमोत्तम ग्रंथांचा संचय असणारे हे सुसज्ज ग्रंथालय अशी महाराष्ट्र सेवा संघाची प्रमुख ओळख आहे. प्रमुख कार्यकारणीचे अध्यक्ष डॉ. आ. रा. कट्टी, उपाध्यक्ष श्री. प्रदीप सप्रे, कार्यवाह श्री. शं. गो. वीरकर यांचे संपूर्ण सहकार्य व प्रोत्साहन आहे त्यामुळे ही वाटचाल सुकर झाली. याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार ! सर्व कर्मचारी वर्गाचे आभार व अभिनंदन.

प्रीती देशपांडे, कार्यवाह — मुकुंद बालंखे, अध्यक्ष

## ऐरोली ग्रंथालय - ग्रंथस्थिती

| **वर्षातील नवीन ग्रंथ खरेदी** | **वर्षात देणगी दाखल मिळालेले ग्रंथ** | **एकूण** |
|---|---|---|
| १५३ | २८० | ४३३ |

**३१-०३-२०१७रोजी उपलब्ध ग्रंथ - ७६०७**

अहवाल वर्षात ३०,५१७ /- रुपये किमतीची ग्रंथखरेदी करण्यात आली.

**ग्रंथालय सभासद तपशील** ३१-३-२०१७ अखेर सभासद

| विशेष सभासद | बाल विभाग | ग्रंथ विभाग | |
|---|---|---|---|
| १३ | ३२ | १७२ | |
| ग्रंथ -अंक विभाग | दीर्घ मुदत सदस्य | अंक विभाग | एकूण |
| १८६ | ०३ | १० | ४१६ |

**ग्रंथालयात दरमहा येणाऱ्या अंक, मासिके व साप्ताहिके यांचा तपशील**

| **प्रकार** | **मासिके** | **त्रैमासिके** | **पाक्षिके** | **साप्ताहिके** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| मराठी | ७३ | १ | ६ | १२ | ९२ |
| हिंदी | १ | - | ४ | - | ५ |
| इंग्रजी | ८ | - | १४ | १२ | ३४ |
| एकूण | ८२ | १ | २४ | २४ | १३१ |

सहस्रचंद्रदर्शन

**दिवाळी अंक योजना**

सभासद संख्या : ५२

अंकाच्या एकूण प्रती : ८९

खरेदी किंमत रुपये : ९,६१६ /-

**मोफत वाचनालयासाठी घेण्यात येणारी वृत्तपत्रे**

| **प्रकार** | **संख्या** | **नाव** |
|---|---|---|
| मराठी | १० | महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, नवाकाळ, सकाळ, सामना, लोकमत, वार्ताहर पुढारी, धावते नवनगर |
| हिंदी | १ | नवभारत टाईम्स |
| इंग्रजी | ५ | टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, डीएनए, मुंबई मिरर. फ्री प्रेस |

अभिप्राय :

अतिशय सुजाण, सुश्रुत प्रेक्षकवर्ग आणि तळमळीने समाजाभिमुख कार्यक्रम करणारे संयोजक अशा दुग्धशर्करा योगाचा अनुभव दिल्याबद्दल धन्यवाद!

सुनीती नागपूरकर

उत्तम व्यवस्थापन, उत्सुक श्रोते यामुळे कार्यक्रम सादर करताना खूप आनंद झाला. आर्थिक विषय समजून घेण्याची श्रोत्यांची जिज्ञासा पाहून कार्यक्रम सफल झाला.

चंद्रशेखर ठाकूर. ५.०३.२०१७



Ahval text17.indd 32 2/2/2019 4:44:48 PM

## अभ्यासिका

आरती सप्रे (अध्यक्ष) - अंजली पेंढरकर (कार्यवाह)

सभासद : मुकुंद शं. बालंखे , छाया देशमुख

ऐरोली अभ्यासिका वार्षिक अहवाल २०१६-१७

या वर्षी देखील अभ्यासिकेचा अहवाल सादर करताना आम्हाला आनंद व अत्यंत समाधान वाटते आहे.

मागील वर्षी ठरविल्याप्रमाणे विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची वाढती गरज लक्षात घेऊन सभासद संख्या ५०० वरुन ५५० करण्याचे घोषित केले. त्याप्रमाणे जुलै २०१६ ते डिसेंबर २०१६ या सत्रांतच उत्तम प्रतिसाद मिळून ५५१ प्रवेश झाल्यावर पुढे प्रवेश बंद केले. तसेच जानेवारी २०१७ ते जून २०१७ या सत्रांसाठी आतापर्यंत ५११ प्रवेश झाले आहेत.

अभ्यासिकेचे प्रवेश अर्ज, ओळखपत्र यांच्या मसुद्यांस योग्य ते बदल करून व्यवस्था जास्तीत जास्त चोख ठेवण्याचे प्रयत्न सफल होत आहेत. इमारतीच्या नूतनीकरणाचाही फायदा अभ्यासिकेला झाला आहे, आसन व्यवस्था, लाईट, पाणी इ. व्यवस्थेमुळे वातावरण अभ्यासाला अनुकूल करण्यात संस्थेला यश आले आहे.


अभ्यासिकेची एकूण व्यवस्था व संस्थेची उत्तम प्रतिमा यामुळे उच्च शैक्षणिक विभागासाठीही देणगी म्हणून येणाऱ्या किंमती व उत्तमोत्तम पुस्तकांची संख्या वाढती आहे. या पुस्तकांचे योग्य जतन व्हावे यासाठी नवीन कपाटांची व्यवस्था करण्यात आली आहे.

पुस्तके योग्य पद्धतीने उपलब्ध करून देऊन अभ्यासिकेत योग्य प्रकारे हाताळली जाातील, गहाळ होणार नाहीत यासाठी वितरणावर नियंत्रणाची व्यवस्था केली आहे.

वेळोवेळी अभ्यासिकेतील समस्यांची, सूचनांची दखल घेतली जाते. शिस्त व स्वच्छता याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाते.

मुख्य कार्यकारणीच्या मार्गदर्शन व सूचनांमुळे कार्य अधिक व सुलभ करता येईल हा मानस आहे.

अंजली पेंढरकर, कार्यवाह | आरती सप्रे, अध्यक्ष


८० वर्षे उत्तम कार्य करणारी संस्था महाराष्ट्र सेवा संघ या संस्थेला भेट देवून संस्थेचे कार्य समजुन घेण्याची संधी मिळाली याचा मला आनंद आहे. संस्थेने भविष्यात अनेक मार्गक्रमण करावे हि शुभेच्छा.

मा. देवेंद्र फडणवीस,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड तर्फे देण्यात आलेले सु.ल. गद्रे साहित्यिक, कलाकार व कै. ल.ग. गद्रे शैक्षणिक पुरस्कार तसेच सु.ल. गद्रे साहित्यिक, कलाकार व महाराष्ट्र सेवा संघाचा सामाजिक संस्था पुरस्कार खालीलप्रमाणे

| वर्ष | साहित्यिक पुरस्कार | कलाकार पुरस्कार | शिक्षक / संस्था पुरस्कार |
|---|---|---|---|
| १९९४ | श्रीमती शांता शेळके | श्रीमती भक्ती बर्वे | सर्वश्री. वसंतराव आगाशे व हरेराम बोडस |
| १९९५ | श्री. शं.ना.नवरे | श्रीमती ललिता पवार | सर्वश्री. चंद्रकांत मापारी व कृ.ल.पटवर्धन |
| १९९६ | श्रीमती सरोजिनी वैद्य | श्री. यशवंत देव | श्री. सय्यद गुलाम दस्तगीर व श्रीमती रेणू दांडेकर |
| १९९७ | श्री. अनिल अवचट | श्रीमती सुचेता भिडे चापेकर | सर्वश्री. अनिल जोशी व भानसिंग पाटील |
| १९९८ | श्री. रत्नाकर मतकरी | श्री. बाबूराव सडवेलकर | श्री. अरुण जोशी व श्रीमती विजया वाड |
| १९९९ | श्रीमती मंगला गोडबोले | श्री. रामदास पाध्ये | श्री. रामकुमार सावंत व श्रीमती वर्षा सहस्त्रबुध्दे |
| २००० | श्रीमती आशा बगे | श्री. शि. द. फडणीस | सर्वश्री. वामन हेर्लेकर, कुलकर्णी व अरुण फाटक |
| २००१ | श्री. लक्ष्मण लोंढे | श्रीमती प्रभा अत्रे | श्री. न.ल. गाडगीळ व श्रीमती सुचेता पडळकर |
| २००२ | श्री. ह.मो. मराठे | श्रीमती प्रिया तेंडुलकर | सावरकर प्रतिष्ठान ,सांगली |
| २००३ | श्रीमती अरुणा ढेरे | श्री. भरत दाभोळकर | दादोजी कोंडदेव सैनिकी शाळा, तांसगांव |
| २००४ | श्री. मारुती चित्तमपल्ली | श्रीमती स्मिता तळवलकर | राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा, पुणे |
| २००५ | श्री. अशोक जैन | श्री. अरविंद गजेंद्रगडकर | सर्वश्री श्री. बाळासाहेब माने व विठ्ठल माने |
| २००६ | श्रीमती प्रतिभा रानडे | श्री. नितीन देसाई | सर्वश्री. रमेश लोणारे व मनोहर नरांजे |
| २००७ | श्रीमती मीना प्रभू | श्री. मोहन जोशी | प्रबोधिनी ट्रस्ट, नाशिक |
| २००८ | श्रीमती उमा कुलकर्णी | श्री. अशोक पत्की | आविष्कार, रत्नागिरी |
| २००९ | श्री. जगदीश खेबूडकर | श्रीमती उषा मंगेशकर | वात्सल्य ट्रस्ट, मुंबई |
| २०१० | डॉ. जयंत नारळीकर | श्री. दिलीप प्रभावळकर | लोकबिरादरी प्रकल्प, हेमलकसा |
| २०११ | श्री. ना.धों. महानोर | सौ. वीणा सहस्त्रबुद्धे | कुष्ठरोग निवारण समिती, नेरे, पनवेल. |
| २०१२ | डॉ. विजया राजाध्यक्ष | श्री. विक्रम गोखले | मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र - पुणे |
| २०१३ | प्रा. शेषराव मोरे | श्री. प्रशांत दामले | सह्याद्रि आदिवासी बहुविध सेवा संघ, देवबांध |
| २०१४ | श्री. निरंजन घाटे | श्री. उत्तम पाचारणे | हेल्पर्स ऑफ दी हॅन्डिकॅप्ड, कोल्हापूर |
| २०१५ | डॉ. प्रतिमा इंगोले | डॉ. मोहन आगाशे | स्नेहज्योती निवासी अंध विद्यालय, दापोली |
| २०१६ | डॉ.माधुरी शानभाग | सुहास जोशी | आधार मतिमंद मुलांची शाळा, मालेगाव |
| २०१७ | डॉ.तारा भावाळकर | अशोक सराफ | —————- |

## पं. वासुदेव आत्माराम लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार

| वर्ष | पुरस्कारप्राप्त विद्वान | क्षेत्र |
|---|---|---|
| २०११ | श्री. देवदत्त गोविंद पाटील | अध्ययन व अध्यापन |
| २०१२ | डॉ. भाग्यलता पाटसकर | अध्ययन व अध्यापन |
| २०१३ | डॉ. मल्हार कुलकर्णी | अध्ययन व अध्यापन |
| २०१४ | श्री. गणेश्वर सांब दीक्षित | अध्ययन व अध्यापन |
| २०१५ | डॉ. मधुसूदन पेन्ना | अध्ययन व अध्यापन |
| २०१६ | डॉ. रवींद्र मुळे | अध्ययन व अध्यापन |



Ahval text17.indd 34 2/2/2019 4:44:48 PM

वैविध्यपूर्ण साहित्यकृतींना प्रोत्साहन मिळावे म्हणून 'साहित्य साधना' पुरस्कार न.चिं. केळकर ग्रंथालयाने १५-०४-२००६ पासून सुरू केला आहे.

| **वर्ष** | **पुरस्कारप्राप्त लेखक** | **साहित्यकृती** |
|---|---|---|
| २००६ | श्री. भारत सासणे | शुभवर्तमान |
| २००७ | श्री. गिरीश प्रभुणे | पारधी |
| २००८ | डॉ. संजय ओक | अवनत होई माथा |
| २००९ | श्री. सुमेध वडावाला | मनश्री |
| २०१० | डॉ. संजय ढोले | प्रेमाचा रेणू |
| २०११ | श्री. गिरीश कुबेर | युद्ध जिवांचे |
| २०१२ | श्रीमती आशा आपराद | भोगिले जे दुःख त्याला |
| २०१३ | डॉ. सदाशिव शिवदे | ज्वलज्ज्वलनतेजस संभाजी राजा |
| २०१४ | हेमंत देसाई | बॉम्बे टॉकीज |
| २०१५ | डॉ. इसादास भडके | गन गन भोवरी |
| २०१६ | बालिका ज्ञानदेव /रवींद्र कोरडे | मॅगझिनीतून सुटतेय गोळी /धुसर झालं नसतं गांव |
| २०१७ | श्री. दत्तात्रय व. कुलकर्णी | टेक्नॉलॉजी ऑल्वेज विन्स |

**विविध कलाक्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराचा सन्मान (एक कलाकार - एक संध्याकाळ)**

| **वर्ष** | **कलाकाराचे नाव** | **क्षेत्र** |
|---|---|---|
| २००५ | श्री. दशरथ पुजारी | संगीत |
| २००६ | श्री. के.ज.पुरोहित (शांताराम) | साहित्य |
| २००७ | श्री. भालचंद्र पेंढारकर | नाट्य. |
| २००८ | श्री. सुहास भालेकर | लोकनाट्य |
| २००९ | श्री. मोरेश्वर कुंटे | मंदिर कोशकार |
| २०१० | श्री. प्रभाकर जोग | व्हायोलीन वादक, संगीतकार |
| २०११ | श्री. भा. ल. महाबळ | साहित्य |
| २०१२ | श्रीमती पुष्पा पागधरे | गायन |
| २०१३ | श्री. चंद्रकांत खोत | साहित्य |
| २०१४ | श्री. वसंत आजगावकर | गायन |
| २०१५ | श्री. जयंत सावरकर | नाट्य |
| २०१६ | श्री. दिनू रणदिवे | पत्रकार |

सहस्रचंद्रदर्शन

**समाजसेवेत कार्यरत असणाऱ्या स्त्री समाजसेवकांना दिला जाणारा, 'सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार'**

| वर्ष | समाजसेवकाचे नाव | संस्था / क्षेत्र |
|---|---|---|
| २०१५ | श्रीमती सुनंदा पटवर्धन | 'प्रगती प्रतिष्ठान', जव्हार |
| २०१६ | श्रीमती उषा मडावी | गोंदिया |
| २०१७ | प्रीती पाटकर | प्रेरणा प्रतिष्ठान, मुंबई |

**देशाला सुरक्षित ठेवणाऱ्या संरक्षणदलातील आणि गृहरक्षकदलातील वीरांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या 'प्रेरणा' पुरस्काराचे मानकरी**

| वर्ष | पुरस्काराचे मानकरी | क्षेत्र |
|---|---|---|
| २०१५ | ग्रुप कॅप्टन दिलीप परुळकर, व्ही.एस.एम. (निवृत्त) | भारतीय हवाई दल |
| | कमांडर रवींद्र पाठक | भारतीय नाविक दल |
| | सुभेदार मेजर अशोक काशीद | भारतीय भूदल |
| | श्री. अप्पा परब | इतिहास संशोधक |
| २०१६ | कमांडर श्रीरंग एन्. बिजूर (निवृत्त) | भारतीय नौदल |
| | शिरीष जनार्दन इनामदार (निवृत्त) अतिरिक्त उपायुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग | महाराष्ट्र पोलिस, |
| | लेफ्टनंट कर्नल सुरेश पाटील (निवृत्त) | भारतीय भूदल |
| | विंग कमांडर जान्हवी खानोलकर | भारतीय हवाई दल |

सहस्रसंकलन

**स्व. अुद्धवराव त्रिविक्रम आठले स्मरणार्थ 'संस्कृत भाषा प्रसार' पुरस्कार**

| | |
|---|---|
| २०१५ | सौ. तरंगिणी खोत |
| | सौ. अर्चना कतिरा |
| २०१६ | श्री. माधव केळकर |
| | श्री. राजेंद्र दातार |



Ahval text17.indd 36 2/2/2019 4:44:49 PM

## महाराष्ट्र सेवा संघाचे मुलुंड व ऐरोली येथील विविध उपक्रम

- विविध कार्यांसाठी अद्ययावत सोयींनी युक्त व विविध क्षमतांची वातानुकूलित सभागृहे
- चित्रप्रदर्शनासाठी अद्ययावत कलादालन
- न.चिं. केळकर ग्रंथालय / सुनीता म. देवधर ग्रंथालय
- विनामूल्य वृत्तपत्र वाचनालय
- ज्ञानेश्वर पुस्तक पेढी
- संस्कृत रसास्वाद वर्ग / संस्कृत भाषा शिक्षण वर्ग
- पं. लाटकरशास्त्री संस्कृत सन्मान पुरस्कार
- अर्थविभाग / उद्योजक सन्मान सोहळा
- आरोग्य विभाग व स्वास्थ्यविषयक कार्यक्रम/ भौतिक उपचार केंद्र
- मैत्रेयी / मैत्री महिला शाखा / संस्कारवर्ग / ग्राहकपेठ
- सुयोग्य संस्थांच्या सहकार्याने संयुक्त कार्यक्रम
- अक्षर मैत्री व स्नेहसंवाद
- नृत्य झंकार / नाट्य कक्ष
- गिरिमित्र संमेलन / युवा विविध गुणदर्शन संमेलने
- विविध विषयांवर व्याख्यानमाला
- पुस्तक (ग्रंथ)जत्रा
- गुणवंत विद्यार्थी गौरव / ज्येष्ठ शिक्षक सन्मान
- वार्षिक साहित्यिक पुरस्कार
- वार्षिक कलाकार पुरस्कार
- वार्षिक सामाजिक संस्था पुरस्कार / सावित्रीबाई फुले स्त्री गौरव पुरस्कार
- वर्धापनदिन सोहळा
- सभासदांसाठी वर्षासहल
- संगीत सभा / क्रीडा विचार मंथन
- चित्रकला प्रदर्शन/ युवा वाटचाल
- अभ्यासिका
- दृष्टिसेवा केंद्र
- विज्ञान विभाग
- सॅल्यूट इंडिया / प्रेरणा पुरस्कार
- आपुलकी - वार्तापत्र

सहस्रचंद्रदर्शन

COPY OF THE REPORT DATED 19 -07-2017 FROM M/S. SINGAVI OTURKAR AND KELKAR, CHARTERD ACCOUNTANTS AND AUDITORS OF MAHARASHTRA SEVA SANGH, MULUND.
REPORT OF AUDITORS RELATING TO ACCOUNTS AUDITED UNDER SUB-SECTION (2) OF SECTION 33 & 34 AND RULE 19 OF THE BOMBAY PUBLIC TRUSTS ACT.
Registration No. F-4020
Name of the Public Trust: Maharashtra Seva Sangh, Mulund
For the year ending 31st March, 2017

(a) Whether accounts are maintained regularly and in accordance with the provisions of the Act and the rules; Yes.
(अ) हिशेब नियमितपणे व घटनेतील तरतुदींनुसार आहेत का? होय

(b)Whether receipt and disbursements are properly and correctly shown in the accounts; Yes.
(ब) हिशेबात जमा व खर्च योग्य रीतीने व बिनचूकपणे दाखविले आहेत का? होय

(c) Whether the cash balance and vouchers in the custody of the manager or trustee on the date of audit were in agreement with the accounts;
Yes.
(क)हिशेब तपासणीच्या तारखेस व्यवस्थापकाच्या किंवा विश्वस्ताच्या ताब्यात असलेली रोख शिल्लक व देयके हिशोबाशी जुळती होती का? होय

(d) Whether all books, deeds, accounts, vouchers or other documents or records required by the auditor were produced before him; Yes.
(ड) हिशेब तपासनीसांनी मागणी केलेली सर्व पुस्तके, खाते, हिशेब, देयके किंवा इतर दस्तऐवज त्यांच्यापुढे सादर करण्यात आले होते का? होय

(e) Whether a register of movable and immovable properties is properly maintainend, the changes therein are communicated from time to time to the regional office and the defects and inaccuracies mentioned in the previous audit report have been duly complied with; Yes
(इ) ट्रस्टच्या स्थावर व जंगम मिळकतीचे नोंदणी पुस्तक अद्ययावत ठेवण्यात आले आहे का? त्यामध्ये होणाया बदलाबद्दल विभाग कार्यालयाकडे नोंद केली का? होय

(f) Whether the manager or trustee or any other person required by the auditor to appear before him did so and furnished the necessary information required by him; Yes.
(फ) हिशेब तपासनीसांनी त्यांच्यापुढे उपस्थित राहण्यास सांगितले असता व्यवस्थापक किंवा इतर कोणताही इसम त्याप्रमाणे हजर झाला किंवा कसे? आणि मागणी केलेली आवश्यक माहिती त्याने पुरविली का? होय

(g) Whether any property or funds of the Trust were applied for any object or purpose other than the object or purpose of the Trust; No.
(ग) ट्रस्टच्या ध्येय व धोरणाव्यतिरिक्त अन्य कोणत्या ध्येय वा धोरणासाठी ट्रस्टच्या कोणत्याही मिळकतीचा किंवा फंडाचा विनियोग करण्यात आला का? नाही
(h) The amounts of outstandings for more than one year and the amounts written off, if any; Yes
(ह) एक वर्षापेक्षा अधिक मुदतीपर्यंत येणे असलेल्या रकमा आणि बुडीत खाती खर्ची टाकलेल्या रकमा (कोणत्याही असल्यास) होय

(i) Whether tenders were invited for repairs or construction involving expenditure exceeding Rs. 5000/-; Yes.
(आय) ५००० रुपयांहून अधिक खर्च लागणाया दुरुस्ती कामांसाठी किंवा बांधकामासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या का? होय



Ahval text17.indd 38 2/2/2019 4:44:49 PM

(j) Whether any money of the public trust has been invested contrary to the provisions of section 35; No.
(ज) कलम ३५ च्या तरतुदीविरुद्ध सार्वजनिक ट्रस्टचा कोणताही पैसा गुंतविण्यात आला आहे का? नाही

(k) Alienations, if any, of the immovable property contrary to the provisions of section 36 which have come to the notice of the auditor; No.
(के) कलम ३६ च्या तरतुदीविरुद्ध स्थावर मिळकतीची करण्यात आलेली विक्री हिशेब तपासनीसांच्या लक्षात आली आहे का? नाही

(l) All cases of irregular, illegal or improper expenditure or failure or omission to recover monies or other property belonging to the public trust or of loss or waste of money or other property thereof and whether such expenditure, failure, omission, loss or waste was caused in consequence of breach of trust or misapplication or any other misconduct on the part of the trustees or any other person while in the management of the trust; No.
(ल) अनियमित, बेकायदेशीर व अयोग्य झालेला खर्च अथवा थकबाकी वसूल करणे बाबतीत विश्वस्त किंवा ट्रस्टची मालमत्ता मिळविणे, राखणेबद्दल प्रचंड हेळसांड अथवा पैसा अगर मालमत्तेसंबंधी अपव्यय या सर्व केसेस व असे प्रकार विश्वस्तांमुळे अगर ट्रस्ट्च्या व्यवस्थापनातील कोणाही इसमामुळे झालेल्या बाबी नाही

(m) Whether the budget has been filed in the form provided by rule 16-A; Yes.
(म) नियम १६-अ मध्ये नमूद केलेल्या परिशिष्टात दाखविल्याप्रमाणे अंदाजपत्रक दाखल केले आहे का? होय

(n) Whether the maximum and minimum number of the trustees is maintained; Yes.
(न) संस्थेत किमान अगर कमाल विश्वस्त कार्यरस्त आहेत का? होय

(o) Whether the meetings are held regularly as provided in such instrument; Yes.
(ओ) ट्रस्टच्या घटना व नियमाप्रमाणे नियमित सभा घेतल्या जात होत्या का? होय

(p) Whether the minute books of the proceedings of the meeting is maintained; Yes.
(प) सदर सभांच्या इतिवृत्ताची वही ठेवण्यात आली आहे का? होय

(q) Whether any of the trustees has any interest in the investment of the trust; No.
(क्यु) या ट्रस्टच्या गुंतवणूकीमध्ये कोणाही विश्वस्तांचे हितसंबंध आहेत का? नाही

(r) Whether any of the trustees is a debtor or creditor of the trust; No.
(र) कोणीही विश्वस्त या ट्रस्टचे कर्जदार अगर देणेदार आहेत का? नाही

(s) Whether the irregularities pointed out by the auditors in the accounts of the previous year have been duly complied with by the trustees during the period of audit; Yes.
(स) हिशेब तपासनीसाने त्याच्या अहवालामध्ये गतसालच्या हिशोबासंबंधी जे दोष दाखविले होते त्या सर्व दोषांची दुरुस्ती व पूर्तता या तपासणी अहवालात झाली का? होय

(t)Any special matter which the auditor may think fit or necesary to bring to the notice of the Deputy or Assistant Charity Commissioner;
No.
(द) हिशेब तपासनीसांना मा. उपधर्मदाय आयुक्त किंवा सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांच्या नजरेत आणण्यास योग्य किंवा आवश्यक वाटेल अशी कोणतीही खास बाब आहे का? नाही

THANE,
Dated :19 - 07- 2017
For Singavi, Oturkar & Kelkar
Chartered Accountants - V.K. Kelkar (Partner)



Ahval text17.indd 39 2/2/2019 4:44:49 PM